## MAHARASHTRA ACT NO. XVIII OF 1972

## THE KONKAN AGRICULTURAL UNIVERSITY (KRISHI VIDYAPEETH) ACT, 1972.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १४ जुलै १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT NO. XVIII OF 1972

## AN ACT TO ESTABLISH AND INCORPORATE A SEPARATE AGRICULTURAL UNIVERSITY IN KONKAN BY THE NAME OF THE KONKAN KRISHI VIDYAPEETH

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १७ जुलै १९७२ प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८

### कोंकणामध्ये, कोंकण कृषि विद्यापीठ या नावाचे एक स्वतंत्र कृषि विद्यापीठ प्रस्थापित व संस्थापित करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७ याद्वारे संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी एक कृषि विद्यापीठ प्रस्थापित करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर नागपूर व औरंगाबाद या महसुली विभागांमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रासाठी, पंजाबराव कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६८, याद्वारे, स्वतंत्र कृषि विद्यापीठ प्रस्थापित करण्यात आले ;

आणि ज्याअर्थी, अनुक्रमे कोंकण व मराठवाडा यांसाठी दुय्यम विद्यापीठ क्षेत्र असावे याकरिता दोन अधिनियमांमध्ये अशी तरतूद करण्यात आली होती की, जीमुळे पंजाबराव कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६८, संमत झाल्यापासून दहा वर्षांत असे प्रत्येक दुय्यम विद्यापीठ क्षेत्र हे त्या त्या प्रदेशाच्या स्वतंत्र विद्यापीठाचे विद्यापीठ क्षेत्र होईल ;

आणि ज्याअर्थी, मराठवाडा प्रदेशासाठी ताबडतोब एक स्वतंत्र कृषि विद्यापीठ असावे असा निर्णय घेण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, कोंकण प्रदेशातील जनतेची तशीच तीव्र इच्छा व भावना लक्षात घेता आणि त्या प्रदेशातील कृषि विकासाची गती वाढविण्याच्या दृष्टीने, त्याच वेळी कोंकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र कृषि विद्यापीठ प्रस्थापित करणे आवश्यक वाटले ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते व कोंकण प्रदेशासाठी स्वतंत्र कृषि विद्यापीठ प्रस्थापित व संस्थापित करण्यासाठी आणि इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी त्वरित कारवाई करणे आवश्यक होते; म्हणून कोंकण कृषि विद्यापीठ अध्यादेश, १९७२ हा, १८ मे १९७२ रोजी, प्रख्यापित करण्यात आला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाऐवजी, यात यानंतर येणाऱ्या विवक्षित फेरफारांसह, राज्य विधानमंडळाचा अधिनियम करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण १

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, कोंकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो १८ मे १९७२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "संलग्न महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखाली असलेले व विद्यापीठास संलग्न असलेले महाविद्यालय ;

(ब) "कृषि" या संज्ञेत मृद व जल व्यवस्थापन, पीकसंवर्धन (रोपांवरील कीड व रोग यांचे नियंत्रण धरून), उद्यान विद्या, कृषि अभियांत्रिकी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुवैद्यक, मत्स्यव्यवसाय, सागरीजीवशास्त्र, वनशास्त्र आणि तसेच गृहशास्त्र, सहकार व कृषिसंबंधीची खरेदी-विक्री, यासंबंधीची (तंत्रशास्त्र धरून) मूल व उपयोजित विज्ञाने यांचा समावेश होतो ;

(क) "घटक महाविद्यालय" म्हणजे, विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली असलेले महाविद्यालय—मग ते मुख्यालयाच्या ठिकाणी किंवा विद्यापीठ अधिक्षेत्रात इतरत्र असो ;

(ड) "विस्तार शिक्षण" म्हणजे, शेतकरी, स्त्री-मजूर व शेतीची मशागत करणारे इतर गट यांना सुधारलेल्या शेती पद्धती आणि शेती व शेतीचे उत्पादन व खरेदी-विक्री यासंबंधीच्या शास्त्रीय तंत्रशास्त्राच्या विविध अवस्था यांतील प्रशिक्षण देण्यासंबंधीची शैक्षणिक कामे; त्यांमध्ये सभा, प्रात्यक्षिके, सुधारलेल्या शेतीच्या पद्धती शिकविण्यासाठी इतर पद्धती यामार्फत करण्यात येईल अशा कामाचा व ही शैक्षणिक कामे करण्यासाठी आवश्यक असलेले कामगारांचे प्रशिक्षण यांचा समावेश होईल ;

(इ) "स्थिरीकरणाचा कालावधी" म्हणजे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून सुरू होणारा व राज्य शासन, शासकीय राजपत्रात अधिसूचित करील अशा तारखेस, समाप्त होणारा विद्यापीठाच्या प्रारंभिक विकासाचा कालावधी; मात्र अशी तारीख, अशा प्रारंभापासून पाच वर्षांनंतरची असणार नाही ;

(फ) "विहित केलेले" म्हणजे, परिनियमाद्वारे विहित केलेले ;

(ग) "मान्यताप्राप्त परिसंस्था" म्हणजे, संलग्न किंवा घटक महाविद्यालयांव्यतिरिक्त, संशोधन किंवा विशेष अभ्यास यासाठी असलेली व विद्यापीठाने अशी परिसंस्था म्हणून मान्यता दिलेली परिसंस्था ;

(ह) "नोंदलेला स्नातक" म्हणजे, या अधिनियमाच्या उपबंधांन्वये नोंदलेला स्नातक ;

(आय्) "परिनियम" व "विनियम" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेले, अनुक्रमे विद्यापीठाचे परिनियम व विनियम ;

(जे) "विद्यापीठ" म्हणजे, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले विद्यापीठ ;

(के) "विद्यापीठ अधिक्षेत्र" म्हणजे, या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र ;

(ल) "विद्यापीठ क्षेत्र" म्हणजे, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे सीमांकित करील असे विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेले विद्यापीठाचे क्षेत्र.

## प्रकरण २

### विद्यापीठ

३. (१) विद्यापीठाचे कुलपती प्रतिकुलपती, प्रथम कुलगुरू व विद्यापीठाच्या विधिसभेचे, विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे व विद्या परिषदेचे पहिले सदस्य आणि जे यानंतर असे कार्यकारी अधिकारी, अधिकारी व सदस्य होतील अशा सर्व व्यक्ती यांची, जोपर्यंत ते असे पद किंवा सदस्यत्व धारण करण्याचे चालू ठेवतील तोपर्यंत, याद्वारे, "कोंकण कृषि विद्यापीठ" या नावाने निगम निकाय म्हणून रचना करण्यात येत आहे व त्याची परंपरा अखंड असेल व त्याचा सामाईक शिक्का असेल आणि त्या नावाने त्यास दावा लावता येईल व त्याजवर दावा करता येईल. विद्यापीठाचे संस्थापन.

(२) विद्यापीठ, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी त्याच्याकडे निहित होईल किंवा त्याच्याकडून संपादन करण्यात येईल अशी कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता, पट्ट्याने देण्यास, विकण्यास किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास आणि करार करण्यास व ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यास, सक्षम असेल.

(३) विद्यापीठाचे मुख्यालय राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा ठिकाणी राहील :

परंतु, राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेद्वारे, विद्यापीठ अधिक्षेत्रातील इतर कोणतेही ठिकाण, विद्यापीठाचे तात्पुरते मुख्यालय म्हणून, नियुक्त करता येईल.

४. (१) विद्यापीठ पुढील प्रयोजनांसाठी प्रस्थापित व संस्थापित करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— विद्यापीठाचे उद्देश व शिक्षणाचे आणि परीक्षेचे माध्यम.

(एक) कृषी व संलग्न विज्ञाने आणि मानव विज्ञान यांच्या शिक्षणासाठी तरतूद करणे ;

(दोन) कृषी व संलग्न विज्ञाने यांतील शिक्षण व संशोधन यांच्या प्रगतीस चालना देणे ;

(तीन) राज्यातील शेती सुधारण्यासाठी व तिच्या विकासासाठी विस्तार शिक्षण कार्यक्रम हाती घेणे व त्याचे मार्गदर्शन करणे ;

(चार) विद्यापीठाच्या निरनिराळ्या विद्याशाखांतील विषयांच्या अध्यापनाचे एकात्मीकरण व समन्वय करणे ;

(पाच) कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणविषयक कामे यांचा समन्वय करणे ;

(सहा) विद्यापीठास योग्य वाटेल अशा रीतीने, विद्यार्थ्यांना शिकविणे व त्यांची परीक्षा घेणे आणि विद्यापीठास योग्य वाटतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करणे ;

(सात) जास्तीत जास्त परिणामक्षमतेसाठी व कमीत कमी खर्चात सर्व स्तरांवर एकात्मीकृत कृषि शिक्षण कार्याची तरतूद करणे ;

(आठ) या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधांशी विसंगत नसतील अशी जी प्रयोजने राज्य शासन, विद्यापीठाने अर्ज केल्यावर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील, अशी इतर प्रयोजने.

(२) विद्यापीठ, शिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करील :

परंतु, परिनियमाद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा विषयांसाठी आणि अशा कालावधी-साठी किंवा कालावधींसाठी, इंग्रजी हे शिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम असेल.

(३) विद्यापीठ, त्याजकडून ज्या विषयांचे शिक्षण देण्यात येईल व ज्या विषयांच्या परीक्षा घेण्यात येतील अशा सर्व विषयांना लागणारी पाठ्यपुस्तके मराठीतून पुरविण्यास, पाच वर्षांच्या मुदतीत प्रारंभ करील.

विद्यापीठात प्रवेश व विवक्षित वर्गास सवलती देणे.

५. ज्यांनी किंवा ज्यांच्या आईवडिलांनी महाराष्ट्र राज्यात १० वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी निवास केला असेल अशा सर्व व्यक्तींना हे विद्यापीठ खुले असेल आणि धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली याच केवळ कारणांवरून, कोणत्याही व्यक्तीला, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी, किंवा अभ्यासक्रम यांतील प्रवेशातून वगळण्यात येणार नाही :

परंतु, विद्यापीठास, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीस अधीन राहून, विद्यापीठाने चालविलेल्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही महाविद्यालयात किंवा संस्थेत, विद्यार्थी म्हणून, प्रवेश मिळण्याच्या प्रयोजनाकरिता पुढील व्यक्तींच्या वर्गासाठी विवक्षित जागा राखून ठेवता येतील :—

(एक) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ;

(दोन) सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांतील व समाजांतील व्यक्ती ;

(तीन) शेतकरी व याबाबतीत परिनियमांन्वये, विहित करण्यात येतील अशा किमान अर्हता किंवा कृषिविषयक अनुभव असलेली शेतकऱ्यांची मुले ;

(चार) राज्यामध्ये, दहा वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीसाठी ज्या व्यक्ती आणि ज्यांचे आईवडील राहिले नसतील अशा व्यक्ती ;

(पाच) स्वातंत्र्य सैनिकांची मुले :

आणखी असे की, विद्यापीठास, तशाच मंजुरीस अधीन राहून, लगतपूर्वीच्या परंतुकातील (एक), (दोन), (तीन) व (पाच) या सर्व किंवा कोणत्याही प्रवर्गाखाली येणाऱ्या व्यक्तींना विद्यापीठास योग्य वाटेल अशी फी किंवा जेवणाचा, राहण्याचा किंवा इतर खर्च किंवा सर्व फी व आकार यांची माफी देता येईल किंवा विद्यापीठास योग्य वाटेल अशा विशेष शिष्यवृत्यांची त्यांच्यासाठी तरतूद करता येईल :

तसेच, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, विहित केलेल्या संख्येहून अधिक विद्यार्थ्यांना किंवा विहित केलेल्या अर्हतेपेक्षा कमी असेल अशी विद्याविषयक किंवा इतर अर्हता असलेल्या विद्यार्थ्यांना कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश देणे विद्यापीठास आवश्यक असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनासाठी "शेतकरी" म्हणजे जी व्यक्ती, मालक किंवा कूळ म्हणून, यथास्थिती, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे परिपोषण भूमीपेक्षा किंवा हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कुटुंबास धारण करता येईल इतक्या जमिनीपेक्षा किंवा मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, कुटुंबास धारण करता येईल इतक्या जमिनीपेक्षा, अधिक नसेल अशी जमीन धारण करीत असेल व जिचे मुख्य उत्पन्न, जमिनीच्या वैयक्तिक मशागतीपासून मिळत असेल अशा व्यक्ती आणि त्या संज्ञेत, जिच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रम हे असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

६. या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, विद्यापीठास पुढील शक्ती असतील व ते पुढील कामे पार पाडील :— विद्यापीठाच्या शक्ती व कामे.

(एक) कृषी व संलग्न विज्ञाने आणि विद्यापीठास योग्य वाटतील अशा विद्येच्या इतर शाखा यांच्या शिक्षणाची तरतूद करणे ;

(दोन) संशोधन करण्यासाठी आणि विस्तार शिक्षण कार्यक्रमाद्वारे, संशोधनाचे निष्कर्ष व तांत्रिक माहिती यांचा प्रसार करण्यासाठी तरतूद करणे ;

(तीन) अभ्यासक्रम सुरू करणे आणि पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी यांसाठी परीक्षा घेणे व ज्यांनी—

(अ) विहित केलेला अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, किंवा

(ब) विहित करण्यात येईल असे संशोधन, विद्यापीठात किंवा याबाबतीत विद्यापीठाने मान्यता दिलेल्या एखाद्या परिसंस्थेत पार पाडले असेल अशा व्यक्तींना, पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करणे ;

(चार) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी चालू करणे ;

(पाच) विहित करण्यात येतील अशा सन्मान्य पदव्या व इतर विशेषोपाधी प्रदान करणे ;

(सहा) विद्यापीठाचे नियत विद्यार्थी म्हणून ज्यांची नावे पटावर दाखल करण्यात आली नसतील असे क्षेत्र कार्यकर्ते, शेतकरी व इतर व्यक्ती यांच्यासाठी व्याख्याने व शिक्षण यांची तरतूद करणे आणि विहित करण्यात येतील अशी प्रमाणपत्रे त्यांना देणे ;

(सात) अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसाठी प्रयोगशाळा, ग्रंथालये, संशोधन केंद्रे, परिसंस्था, प्रात्यक्षिक केंद्रे, वस्तुसंग्रहालये व मत्स्यालये स्थापन करणे, व त्यांची व्यवस्था ठेवणे आणि विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी योग्य वाटतील अशा इतर सोयींची तरतूद करणे ;

(आठ) कृषी व उपयोजित विज्ञाने यासंबंधीची महाविद्यालये, शाळा, केंद्रे, गृहविज्ञान शाखा, कर्मशाळा शाखा व इतर परिसंस्था व त्यांची वसतिगृहे सुरू करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(नऊ) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा निवास, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे आरोग्य व कल्याण यांचे संवर्धन करण्यासाठी व्यवस्था करणे ;

(दहा) विद्यापीठास आवश्यक असतील अशी अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसाठी पदे सुरू करणे व अशा पदांवर व्यक्ती नियुक्त करणे ;

(अकरा) प्रशासकीय, लिपिक वर्गीय व इतर पदे निर्माण करणे व अशा पदांवर व्यक्तींची नियुक्ती करणे ;

(बारा) परिनियमांनुसार अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या व पारितोषिके चालू करणे व ती देणे ;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी फी व इतर आकार निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती स्वीकारणे ;

(चौदा) विद्यापीठ ठरवील अशा रीतीने व अशा प्रयोजनांसाठी, इतर विद्यापीठांशी व शासकीय विभागांशी सहकार्य करणे ;

(पंधरा) विद्यापीठाच्या व त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या महाविद्यालयांच्या व परिसंस्थांच्या विद्यार्थ्यांच्या व कर्मचारीवर्गाच्या गरजा भागविण्यासाठी, ग्राहक सहकारी संस्थांची तरतूद करणे ;

(सोळा) विद्यापीठाच्या उद्देशांच्या पुरःसरणार्थ आवश्यक असतील अशी सर्व कामे व गोष्टी —मग ती शक्ती व कामे यांशी आनुषंगिक असोत वा नसोत—करणे.

विशिष्ट महाविद्यालये व परिसंस्था विद्यापीठाकडे हस्तांतरित करणे. ७. (१) महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून (या कलमात यापुढे जिचा "उक्त तारीख" असा निर्देश केला आहे) दापोली येथील कृषि महाविद्यालय आणि मुंबई येथील पशुवैद्यक महाविद्यालय ही, महात्मा फुले कृषि विद्यापीठाची घटक महाविद्यालये असल्याचे बंद होईल आणि ती या विद्यापीठाची घटक महाविद्यालये म्हणून विद्यापीठाकडे जातील व विद्यापीठाकडून त्यांचे घटक महाविद्यालये म्हणून व्यवस्थापन करण्यात येईल:

परंतु महात्मा फुले कृषि विद्यापीठ, उक्त तारखेपूर्वी त्या विद्यापीठाने किंवा त्याच्या वतीने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेत बसलेल्या उक्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना किंवा इतर कोणत्याही स्नातकोत्तर किंवा इतर विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यास व त्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी देण्यास सक्षम असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या महाविद्यालयांचे नियंत्रण व व्यवस्थापन, उक्त तारखेपासून, विद्यापीठाकडे हस्तांतरित होईल आणि त्या संबंधातील महात्मा फुले कृषि विद्यापीठाची सर्व मालमत्ता व मत्ता आणि दायित्वे विद्यापीठाकडे हस्तांतरित व निहित होतील.

(३) हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले परिनियम व विनियम यांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महाविद्यालयाचा जो कोणताही विद्यार्थी किंवा कोणताही स्नातकोत्तर किंवा अन्य विद्यार्थी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेचा, उक्त तारखेच्या निकटपूर्वी, अभ्यास करीत असेल किंवा त्यासाठी पात्र असेल त्या विद्यार्थ्यास, त्या परीक्षेची तयारी करून त्याचा पाठ्यक्रम पूर्ण करण्याची परवानगी देण्यात येईल आणि विद्यापीठ संबंधित विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार, अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण व परीक्षा यांची, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी व अशा रीतीने, तरतूद करील.

(४) विद्यापीठ अधिक्षेत्रामध्ये असतील आणि उक्त तारखेच्या लगतपूर्वी, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७ याच्या कलम ७ ची पोट-कलमे (५) आणि (७) अन्वये एकतर महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडे हस्तांतरित आणि निहित असतील किंवा त्या विद्यापीठाने, राज्य शासनाच्या मंजुरीने स्थापन केल्या असतील व उक्त तारखेच्या लगतपूर्वी (त्या विद्यापीठाकडे) निहित असतील अशा संशोधन आणि इतर परिसंस्था व ग्रामसेवक प्रशिक्षण केन्द्रे आणि इतर केन्द्रे, कामे आणि परिसंस्था, ह्या, त्या तारखेपासून, विद्यापीठाकडे हस्तांतरित होतील आणि अशा सर्व परिसंस्थांच्या संबंधातील त्या विद्यापीठाची सर्व मालमत्ता व मत्ता आणि दायित्वे, उक्त विद्यापीठाकडे हस्तांतरित व निहित होतील.

(५) उक्त तारखेपूर्वी, पोट-कलम (१) किंवा (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या संबंधात महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कोणताही करार केला असेल त्याबाबतीत, तो करार या विद्यापीठाने केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यातील महात्मा फुले कृषि विद्यापीठासंबंधीच्या कोणत्याही निर्देशाचा या विद्यापीठासंबंधीचा निर्देश असल्याप्रमाणे, अर्थ लावण्यात येईल.

(६) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा कृषि विभागाच्या व राज्य शासनाच्या इतर विभागांच्या संशोधन व इतर संस्थांचे नियंत्रण व व्यवस्थापन, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून, विद्यापीठाकडे हस्तांतरित होईल आणि त्यानंतर अशा संस्थांच्या संबंधातील राज्य शासनाची, सर्व मालमत्ता व मत्ता आणि दायित्वे ही सुद्धा त्याचप्रमाणे विद्यापीठाकडे हस्तांतरित व निहित होतील.

(७) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून तीन वर्षे मुदतीच्या आत किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा आणखी मुदतीच्या आत, राज्य शासन, विद्यापीठ अधिक्षेत्रात असतील आणि ज्या कृषि विभागाच्या किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही

विभागाच्या किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असतील किंवा असू शकतील अशा, कृषि शाळा, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रे, गृहविज्ञान शाखा, कर्मशाळा शाखा, मृदसंधारण प्रशिक्षण केंद्रे आणि बागकाम किंवा माळ्याचे प्रशिक्षण, तेल इंजिनाचा वापर व परिरक्षण यांचे प्रशिक्षण, पशुपाल प्रशिक्षण, कुक्कुटपालन प्रशिक्षण, सामुदायिक प्रशिक्षण, उजळणी प्रशिक्षण व त्यासारखे अल्प मुदतीचे पाठ्यक्रम विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्याची व्यवस्था करील व विद्यापीठ तदनंतर त्यांच्या परिरक्षणाची जबाबदारी पत्करील.

८. (१) कुलपतीस, तो निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून, विद्यापीठ, त्याच्या तपासणी व इमारती, कृषिक्षेत्रे, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये, कर्मशाळा यांची व विद्यापीठाने चालविलेले चौकशी किंवा त्यांच्या व्यवस्थेखाली अललेले कोणतेही महाविद्यालय, परिसंस्था किंवा वसतिगृह यांची साधनसामुग्री व विद्यापीठ करीत असलेली किंवा विद्यापीठाच्या विद्यमाने चालविण्यात येणारी अध्यापनाची किंवा इतर कामे यांची आणि परीक्षा घेण्याची व्यवस्था व विद्यापीठाची इतर कामे यांची तपासणी करवून घेता येईल आणि विद्यापीठाच्या प्रशासनाशी व अर्थव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी चौकशी करण्याची व्यवस्था करता येईल.

(२) कुलपती, अशा प्रत्येक प्रकरणी, अशी तपासणी किंवा चौकशी करवून घेण्याच्या आपल्या हेतूबद्दलची यथोचित नोटीस विद्यापीठास देईल आणि विद्यापीठास, प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार असेल ; उक्त प्रतिनिधीस अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी, उपस्थित राहण्याचा व आपली बाजू मांडण्याचा अधिकार असेल.

(३) कुलपती, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निकालासंबंधीची राज्य शासनाची मते विद्यापीठास कळवील आणि त्यास विद्यापीठाच्या त्यावरील मताबद्दल खात्री करून घेतल्यानंतर, करावयाच्या कारवाईबद्दल विद्यापीठास सल्ला देता येईल व अशी कारवाई करण्यासाठी मुदत निश्चित करता येईल.

(४) विद्यापीठ, अशा रीतीने निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, राज्य शासनाने दिलेल्या सल्ल्यावरून जी कारवाई करण्यात आली असेल किंवा करण्याचे योजिले असेल त्याबद्दल कुलपतीस कळवील.

(५) कुलपतीस, निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, त्याचे समाधान होईल अशा रीतीने विद्यापीठाकडून, कारवाई करण्यात आली नसेल, तर आणि त्याबाबतीत विद्यापीठाने सादर केलेले, स्पष्टीकरण किंवा दिलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, निदेश देता येतील आणि विद्यापीठ अशा निदेशांचे पालन करील.

(६) निकटपूर्वीच्या पोट-कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यापीठाच्या उद्देशांच्या पुष्ट्यर्थ किंवा हा अधिनियम आणि परिनियम आणि विनियम यांच्या उपबंधानुसार कोणत्याही बाबतीत विद्यापीठाचे कामकाज चालविण्यात येत नाही किंवा विद्यापीठाचे अध्यापन, परीक्षा, संशोधन किंवा विस्तार शिक्षण यांचा दर्जा ठेवण्यासाठी विशेष उपाय योजणे इष्ट आहे, असे कोणत्याही वेळी कुलपतीचे मत होईल तर, त्यास, ज्या बाबीसंबंधातील स्पष्टीकरण आवश्यक असेल ती बाब विद्यापीठाकडे सूचित करता येईल आणि तो विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत, असे स्पष्टीकरण देण्याबद्दल विद्यापीठास सांगता येईल. विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीच्या आत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात विद्यापीठ कसूर करील किंवा कुलपतीच्या मते समाधानकारक नसेल असे स्पष्टीकरण विद्यापीठ देईल तर, कुलपतीस, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि विद्यापीठ अशा निदेशांचे पालन करील.

(७) विद्यापीठ, कुलपती वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे, विद्यापीठाचे प्रशासन व आर्थिक परिस्थिती यासंबंधीची माहिती पुरवील.

(८) राज्य शासन वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे, विद्यापीठाची मालमत्ता किंवा त्याचे कामकाज यासंबंधातील विवरणे किंवा इतर माहिती, विद्यापीठ राज्य शासनास देईल.

## प्रकरण ३

### विद्यापीठाचे अधिकारी

विद्यापिठाचे अधिकारी व कर्मचारी यांचे वर्गीकरण. ९. विद्यापीठातील कर्मचारीवर्गाचे खालील प्रवर्गांपैकी एका प्रवर्गात वर्गीकरण करण्यात येईल :—

(अ) कार्यपालक व इतर अधिकारी.—ज्यांना प्रशासकीय प्राधिकार असेल व ज्यांना ह्या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये अशा प्रकारे पदनिर्देशित करण्यात आले असेल.

(ब) विद्याविषयक कर्मचारीवर्ग.—ज्यांना अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसारखे विद्याविषयक काम असेल व जे, या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये पदनिर्देशित करण्यात येतील असे, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता किंवा प्रयोग निर्देशक किंवा तत्सम व्यावसायिक पद धारण करीत असतील.

(क) लिपिक वर्गीय कर्मचारी.—जे विद्यापीठाच्या सेवेत असतील व ज्यांचा वरील (अ) व (ब) मध्ये समावेश करण्यात आलेला नसेल.

कार्यपालक व इतर अधिकारी. १०. विद्यापीठाचे कार्यपालक व इतर अधिकारी खालील प्रमाणे असतील :—

(अ) कार्यपालक

(एक) कुलपति,
(दोन) प्रति-कुलपति,
(तीन) कुलगुरू.

(ब) इतर अधिकारी

(चार) शिक्षण संचालक,

(पाच) संशोधन संचालक,

(सहा) विस्तार शिक्षण संचालक,

(सात) विद्यार्थी कल्याण संचालक,

(आठ) विद्याशाखांचे अधिष्ठाते,

(नऊ) सहयोगी अधिष्ठाते,

(दहा) कुलसचिव,

(अकरा) नियंत्रक,

(बारा) परिनियमान्वये विद्यापीठाचे अधिकारी म्हणून घोषित करण्यात येतील अशा इतर व्यक्ती :

परंतु, "इतर अधिकारी" या प्रवर्गातील त्याच व्यक्तीची एकापेक्षा अधिक पदांवर नेमणूक करता येईल.

कुलपति. ११. (१) त्या त्या वेळचे महाराष्ट्राचे राज्यपाल विद्यापीठाचे कुलपति असतील.

(२) कुलपति हे, त्यांच्या पदपरत्वे, विद्यापीठाचे प्रमुख असतील आणि उपस्थित असतील तेव्हा ते, विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष राहतील.

(३) कुलपतीस, आपल्या माहितीसाठी म्हणून, विद्यापीठाच्या कामकाजासंबंधीचे कोणतेही कागदपत्र मागविता येतील आणि विद्यापीठ अशा मागणीचे पालन करील.

(४) सन्मान्य पदवी प्रदान करण्याचा प्रत्येक प्रस्ताव, कुलपतीकडून कायम केला जाण्याच्या अधीन असेल.

(५) कुलपतीस, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे, हा अधिनियम, परिनियम किंवा विनियम यास अनुसरून नसेल असे कोणतेही कामकाज, लेखी आदेशान्वये, विलोपित करता येईल :

परंतु, कुलपती, असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, असा आदेश का काढण्यात येऊ नये यासंबंधीची कारणे दर्शविण्यासाठी अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास फर्मावील आणि याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा वेळेच्या आत कोणतेही कारण दर्शविण्यात आले असेल तर, तो त्याचा विचार करील.

(६) कुलपती, ह्या अधिनियमान्वये घालून देण्यात येतील व परिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात येतील किंवा त्याजकडे सोपविण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

१२. (१) महाराष्ट्र राज्याचे त्या त्या वेळचे कृषि मंत्री, विद्यापीठाचे प्रति-कुलपती असतील आणि ते विद्योसभेचे सभापती असतील. प्रति-कुलपती.

(२) प्रति-कुलपतीला, स्वतःच्या माहितीकरिता, विद्यापीठाच्या कामकाजासंबंधातील कोणतेही कागदपत्र मागविता येतील व विद्यापीठ अशा मागणीचे पालन करील.

(३) विद्यापीठाच्या कामकाजाचा वार्षिक कार्यक्रम, प्रति-कुलपतीकडे त्याच्या माहितीसाठी पाठविण्यात येईल व त्याने केलेल्या कोणत्याही सूचनेचा, उक्त कार्यक्रम विधिसभेकडे सादर करण्यापूर्वी, कार्यकारी परिषदेकडून, विचार करण्यात येईल.

(४) प्रति-कुलपती, या अधिनियमान्वये किंवा परिनियमांन्वये त्याला प्रदान करण्यात येतील अशा कुलपतीच्या शक्तींचा वापर करील आणि कुलपतीची अशी कर्तव्ये पार पाडील. तसेच तो, कुलपती लेखी आदेशाद्वारे प्रति-कुलपतीकडे सोपवील अशा कुलपतीच्या इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये बजावील आणि अशा रीतीने शक्ती व कर्तव्ये सोपविणे हे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा निर्बंधास व शर्तीस अधीन असेल.

१३. (१) ह्या पोट-कलमाच्या उपबंधानुसार कुलगुरूची नेमणूक करण्यात येईल. कुलगुरूची निवड करण्यासाठी तीन व्यक्तींची एक समिती असेल व त्या तीन व्यक्तींपैकी दोन व्यक्ती कार्यकारी परिषदेच्या सदस्य असतील व त्या परिषदेकडून नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या असतील व एक व्यक्ती कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात येईल. तसेच, कुलपती अशा समितीचा सभापती म्हणून तिघांपैकी एकाची नियुक्ती करील. समिती, विशेषेकरून कृषी किंवा इतर संबद्ध शास्त्रांपैकी कोणत्याही शास्त्रात सुयोग्य अर्हताप्राप्त असतील अशा तीनपेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींची निवड करील व आपली निवड कुलपतीला कळवील. कुलपतीस अशा रीतीने निवडलेल्या व्यक्तींपैकी एकास कुलगुरू म्हणून मान्यता देता येईल व तिची नेमणूक करता येईल. अशा रीतीने निवडलेल्या व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती कुलपतीस मान्य नसेल किंवा कुलपतीने मान्य केलेल्या व्यक्तीची पद स्वीकारण्याची इच्छा नसेल तर, कुलपतीस नव्याने निवड करण्याबद्दल सांगता येईल. विद्यमान कुलगुरूची मुदत संपण्याच्या तारखेच्या तीन महिने अगोदर, समिती आपल्या निवडीबद्दल कुलपतीस कळवील. जर समिती आपले प्रतिवृत्त वेळेवर सादर करण्यात कसूर करील तर, कुलपतीला, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीची कुलगुरू म्हणून नेमणूक करता येईल. कुलगुरू.

(२) कुलगुरू हा विद्यापीठाचा सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल.

(३) कुलगुरू पाच वर्षे मुदतीपर्यंत पद धारण करील व कुलपतीस, मुदतीत वाढ करणाऱ्या आदेशात नमूद करण्यात येईल अशा कारणावरून, अपवादात्मक परिस्थितीत उक्त मुदतीत एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीपर्यंत वाढ करता येईल.

(४) तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर कुलपतीकडे लेखी राजीनामा सादर करून कुलगुरूला आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. कुलपतीकडून राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतर तो अंमलात येईल.

(५) कुलपतीस, विधीसभेच्या एकूण सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांनी आणि उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या तिच्या सदस्यांच्या दोन-तृतियांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी, संमत केलेल्या ठरावाच्या आधारे, विधीसभेने केलेल्या शिफारशीवरून, त्याच्या मते कुलगुरू पदावर असण्याचे चालू राहणे हे विद्यापीठाच्या हितसंबंधास बाधक ठरत असेल तर, आदेशाद्वारे, कुलगुरूस कोणत्याही वेळी पदावरून काढून टाकता येईल :

परंतु, कुलगुरूविरुद्ध करण्याच्या योजिलेल्या कारवाईसंबंधात, त्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(६) कुलगुरूला द्यावयाची वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती, कार्यकारी परिषद ठरवील आणि कुलगुरूने, त्याच्या नेमणुकीच्या वेळी मान्य केल्या असतील त्याप्रमाणे असतील आणि त्यामध्ये, त्याच्या नेमणुकीनंतर, त्याचा गैरफायदा होईल अशा रीतीने, त्याच्या संमतीशिवाय, कोणताही फेरबदल करता येणार नाही.

(७) मृत्यू, राजीनामा यामुळे किंवा अन्यथा कुलगुरूचे पद रिकामे झाल्याच्या प्रसंगी, अधिष्ठाता किंवा त्या प्रयोजनार्थ कुलपतीकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी कोणतीही इतर व्यक्ती, नवीन कुलगुरू आपले पद धारण करील त्या तारखेपर्यंत, कुलगुरू म्हणून काम पाहील.

(८) रजा, आजारीपण किंवा इतर कारणामुळे कुलगुरूचे पद तात्पुरते रिकामे होईल त्या-बाबतीत, प्रति-कुलपती, कुलगुरूच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था करील. अशी व्यवस्था करण्यात येईतोपर्यंत, अधिष्ठाता किंवा त्या प्रयोजनार्थ प्रति-कुलपती-कडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी इतर कोणतीही व्यक्ती, कुलगुरूच्या पदाची चालू कर्तव्ये पार पाडील :

परंतु, दोन महिन्यांपेक्षा कमी मुदतीसाठी पद रिकामे झाल्याच्या बाबतीत, कुलगुरू लेखी आदेशाद्वारे, आपली कर्तव्ये, तातडीची उपाययोजना म्हणून, अधिष्ठात्याकडे किंवा कोणताही अधिष्ठाता नसेल तर, कुल-सचिवाकडे सोपवील.

कुलगुरूच्या शक्ती व कर्तव्ये. १४. (१) कुलगुरू हा विद्यापीठाचा प्रमुख कार्यपालक व विधीसभेचा पदसिद्ध सदस्य असेल. कुलपतीच्या किंवा प्रति-कुलपतीच्या अनुपस्थितीत, तो विद्यापीठाच्या कोणत्याही पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष राहील. तसेच, तो कार्यकारी परिषदेचा व विद्यापरिषदेचा पदसिद्ध सदस्य व अध्यक्ष असेल.

(२) कुलगुरूचे विद्यापीठाच्या कामकाजावर सर्वसाधारण नियंत्रण असेल व विद्यापीठामध्ये शिस्तीचे यथोचित पालन होण्यासाठी तो जबाबदार असेल.

(३) कुलगुरूस कार्यकारी परिषदेच्या व विद्यापरिषदेच्या सभा बोलाविण्याची शक्ती असेल.

(४) हा अधिनियम आणि परिनियम व विनियम यांच्या उपबंधांचे निष्ठापूर्वक पालन केले जाईल याबद्दल खात्री करून घेणे हे कुलगुरूचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनाकरिता त्यास आवश्यक त्या सर्व शक्ती असतील.

(५) विद्यापीठाचे योग्य प्रशासन आणि अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यक्रम यांचा दृढ समन्वय व एकात्मीकरण यासाठी कुलगुरू जबाबदार असेल.

(६) कुलगुरू, समुचित अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत, मुख्यालयाच्या ठिकाणी व मुख्यालयाबाहेर, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी महाविद्यालये, विभाग, विशेषीकृत अभ्यास संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालये, संग्रहालये, वसतिगृहे व [illegible] यांची व्यवस्था ठेवील

(७) कुलगुरूस, महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व वसतिगृहे यांच्याकडून विद्यापीठाचे कामकाज योग्य रीतीने चालविण्याकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा विद्यापीठविषयक सर्व कार्यक्रमाचे अहवाल मागविता येतील.

(८) कुलगुरू विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा निवास, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख ठेवील व त्यांवर नियंत्रण ठेवील आणि विहित करण्यात येईल अशा समितीशी विचारविनिमय करून, विद्यार्थ्यांचे आरोग्य व सर्वसाधारण कल्याण यांच्या संवर्धनासाठी व्यवस्था करील.

(९) कुलगुरूस, या अधिनियमात तरतूद करण्यात आली असेल त्याप्रमाणे किंवा परिनियमांत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची शक्ती असेल.

(१०) कुलगुरू, वार्षिक लेखे व ताळेबंद कार्यकारी परिषदेकडे व विधीसभेकडे वेळेवर सादर करण्यास जबाबदार असेल.

(११) कुलगुरू विद्यापीठाची मालमत्ता व निधी धारण करील, त्यावर नियंत्रण ठेवील व त्याची व्यवस्था पाहील.

(१२) कुलगुरू विशिष्ट कारणांसाठी विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यात आलेल्या निधीची व्यवस्था ठेवील.

(१३) कुलगुरू, विद्यापीठाचे काम चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती, जागा, उपकरणे व इतर साधने यांची त्यास उपलब्ध असलेल्या साधनांमधून तरतूद करील.

(१४) कुलगुरू, हा अधिनियम व परिनियम यांद्वारे व तदन्वये विद्यापीठास नेमून दिलेल्या शक्तींचा वापर करताना आणि कर्तव्ये बजाविताना, विद्यापीठाच्या वतीने, त्या कारणासाठी कार्यकारी परिषदेने नियुक्त करावयाच्या वित्त व विधी समित्यांच्या सल्ल्यानुसार, कार्यकारी परिषदेच्या सहमतीने करार करील, त्यात फेरबदल करील, ते पार पाडील किंवा ते रद्द करील.

(१५) तावडतोब उपाययोजना करणे आवश्यक आहे असे कुलगुरूचे मत होईल अशा कोणत्याही निकडीच्या परिस्थितीत, तो प्रति-कुलपतीच्या नियंत्रणास अधीन राहून, त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करील आणि त्यानंतर, कार्यकारी परिषदेस आणि सर्वसाधारण नित्यक्रमात ज्या इतर प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने उक्त बाबीसंबंधात कार्यवाही केली असती त्या प्राधिकरणास किंवा अधिकाऱ्यास, आपण केलेल्या उपाययोजना लवकरात लवकर कळवील.

(१६) लगतपूर्वीच्या पोट-कलमान्वये कुलगुरूने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे विद्यापीठाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीवर, तिला अहितकारक होईल अशा रीतीने परिणाम होईल त्याबाबतीत, अशा व्यक्तीस, अशी कार्यवाही केल्याबद्दलची नोटीस तिला मिळाली असेल त्या तारखेपासून तीस दिवसांचे आत कार्यकारी परिषदेकडे अपील करता येईल व कार्यकारी परिषद आपल्या पुढील सभेत, अपिलावर विचारविनिमय करील व अपिलाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत आपला निर्णय देईल.

(१७) कार्यकारी परिषदेच्या अपिलातील आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कुलपतीकडे अपील करता येईल व अशा अपिलावरील कुलपतीचा निर्णय अंतिम असेल.

(१८) निकटपूर्वीच्या पोट-कलमांच्या उपबंधांस अधीन राहून, कुलगुरू विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही कर्मचाऱ्याची नेमणूक, निलंबन, काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे यासंबंधातील कार्यकारी परिषदेचे आदेश अंमलात आणील.

(१९) या अधिनियमान्वये घालून देण्यात येतील व परिनियमान्वये प्रदान करण्यात येतील किंवा त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा इतर शक्तींचा कुलगुरू वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

कुलसचिव.

१५. (१) कुलसचिव हा सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने कुलगुरूकडून त्याची नियुक्ती करण्यात येईल.

(२) कुलसचिव हा, विद्यापीठाच्या अभिलेखांच्या व सामाईक शिक्क्यांच्या योग्य अभिरक्षेसाठी जबाबदार असेल. तो विधीसभेचा, कार्यकारी परिषदेचा व विद्यापरिषदेचा पदसिद्ध सचिव असेल आणि कामकाजासंबंधीची सर्व उपलब्ध माहिती त्यांच्यापुढे सादर करणे त्यास बंधनकारक असेल. विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासंबंधीचे अर्ज तो स्वीकारील व सर्व पाठ्यक्रम, अभ्यासक्रम व आवश्यक असलेली इतर माहिती यासंबंधी कायम स्वरूपाचे अभिलेख ठेवील.

(३) कुलसचिवास, आपल्या स्वाक्षरीने, कुलगुरूस लेखी कळवून, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. ज्या तारखेपासून पदमुक्त होण्याची कुलसचिवाची इच्छा असेल त्या तारखेच्या सामान्यपणे साठ दिवस अगोदर राजीनामा कुलगुरूच्या स्वाधीन करण्यात येईल ; परंतु कार्यकारी परिषदेला त्यास यापूर्वीही पदमुक्त करता येईल. पदमुक्त केल्याच्या तारखेपासून राजीनामा अमलात येईल.

(४) कोणत्याही कारणास्तव, रजेवर गेल्यामुळे, कुलसचिवाच्या तात्पुरत्या अनुपस्थितीत किंवा इतर कोणत्याही रीतीने रिकामी जागा भरण्यात येईतोपर्यंत, कुलगुरू, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी, कुलसचिव म्हणून काम करण्याकरिता कोणत्याही योग्य व्यक्तीची नेमणूक करील.

(५) कुलसचिव, विद्यार्थ्यांनी घेतलेले पाठ्यक्रम, मिळविलेली श्रेणी, देण्यात आलेल्या पदव्या, पारितोषिके किंवा मिळविलेली इतर प्राविण्ये व विद्यार्थ्यांच्या विद्याविषयक कार्याशी संबंधित असतील अशा इतर बाबी धरून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या विद्याविषयक कार्याचे, कायम स्वरूपाचे अभिलेख ठेवण्यास जबाबदार असेल.

(६) कुलसचिव, हा अधिनियमान्वये घालून देण्यात येतील किंवा परिनियमान्वये किंवा कुलगुरूकडून, त्यास प्रदान करण्यात येतील किंवा त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये बजावील.

विद्याशाखांचे अधिष्ठाते.

१६. (१) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, कुलगुरूकडून त्याची नियुक्ती करण्यात येईल.

(२) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, विद्याशाखेचा मुख्य कार्यपालक व विद्याविषयक अधिकारी असेल व त्या विद्याशाखेच्या प्रशासनासाठी तो कुलगुरूस जबाबदार असेल.

विद्याशाखेच्या अधिष्ठात्यांच्या शक्ती व कर्तव्ये.

१७. (१) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, विद्याशाखेत समाविष्ट असलेल्या विभागातील अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांचे संघटन करण्यासाठी व ते चालविण्यासाठी जबाबदार असेल आणि त्या प्रयोजनाकरिता, तो, संबंधित विभागाच्या प्रमुखाशी विचारविनिमय करून आवश्यक असतील असे आदेश देईल.

(२) अधिष्ठाता, विद्याशाखेसंबंधातील परिनियम व विनियम यांचे योग्य पालन होत आहे हे पाहील व त्यासाठी तो जबाबदार असेल.

(३) तो, विद्याशाखेच्या सभांचा अध्यक्ष राहील.

(४) तो, धोरण आखील व विचारार्थ ते विद्यापरिषदेकडे सादर करील.

(५) तो, विद्याशाखेच्या वेगवेगळ्या विभागांच्या कामाचे अहवाल कुलगुरूस देईल.

(६) तो, विद्याशाखेच्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची नोंदणी व प्रगती यांवर देखरेख ठेवील.

(७) तो, महाविद्यालये, शाळा व संशोधन संस्था यांसाठी नेमून देण्यात आलेल्या इमारती व साधनसामुग्री यांच्या योग्य वापरासंबंधी कुलगुरूला जबाबदार असेल.

(८) तो, तांत्रिक क्षेत्रातील समुचित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी विचारविनिमय करून अर्थसंकल्प तयार करील.

(९) प्रत्येक अधिष्ठात्यास, या अधिनियमामध्ये घालून देण्यात येतील किंवा त्या अन्वये विहित करण्यात येतील अशा इतर शक्ती असतील व अशी इतर कर्तव्ये तो पार पाडील.

**शिक्षण संचालक.**

१८. (१) शिक्षण संचालक हा, सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, त्याची, कुलगुरूकडून, नियुक्ती करण्यात येईल.

(२) संचालक, प्रत्यक्ष कुलगुरूच्या हाताखाली काम करील व महाविद्यालये आणि इतर अध्यापन परिसंस्था यांची कामे यथोचित रीत्या पार पाडण्यासाठी तो जबाबदार असेल व तो विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या संपूर्ण सहकार्याने, विद्यापीठाच्या सर्व घटक व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षणाचा समन्वय करील व त्यांचे मार्गदर्शन करील.

(३) संचालक, या अधिनियमामध्ये घालून दिलेल्या आणि विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**संशोधन संचालक.**

१९. (१) संशोधन संचालक, सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, कुलगुरूकडून त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) संचालक, कुलगुरूच्या प्रत्यक्ष हाताखाली काम करील व विद्यापीठ अधिक्षेत्रातील सर्व संशोधन केंद्रांची कामे योग्य रीतीने पार पाडली जात आहेत हे पाहण्यास तो जबाबदार असेल व तो विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या संपूर्ण सहकार्याने विद्यापीठाच्या सर्व संशोधनाचा समन्वय करील.

(३) संचालक, या अधिनियमामध्ये घालून दिलेल्या व विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**विस्तार शिक्षण संचालक.**

२०. (१) विस्तार शिक्षण संचालक, सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, कुलगुरूकडून, त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) संचालक प्रत्यक्ष कुलगुरूच्या हाताखाली काम करील आणि तो, विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या संपूर्ण सहकार्याने, विद्यापीठाच्या सर्व विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा समन्वय करण्यास जबाबदार असेल.

(३) संचालक, या अधिनियमामध्ये घालून दिलेल्या व त्या अन्वये विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**विद्यार्थी कल्याण संचालक.**

२१. (१) विद्यार्थी कल्याण संचालक सर्व कालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, कुलगुरूकडून, त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) संचालक, प्रत्यक्ष कुलगुरूच्या हाताखाली काम करील व विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करणे, शिष्यवृत्त्या व फी-माफीची संधी, वैद्यकीय सुखसोयी, अभ्यासेतर कार्य, विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संपर्क, विद्यार्थ्यांना सल्ला देणे, नोकऱ्यांची संधी, स्नातकांना नोकऱ्या मिळवून देणे व त्यांच्या इतर समस्या या बाबतच्या सर्व बाबी हाताळण्यास तो जबाबदार असेल.

(३) संचालक, या अधिनियमामध्ये घालून दिलेल्या व त्या अन्वये विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

सहयोगी अधिष्ठाता. २२. (१) सहयोगी अधिष्ठाता सर्वकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, कुलगुरूकडून, त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) सहयोगी अधिष्ठाता, विहित केलेल्या प्रदेशाच्या हद्दीमध्ये, सर्व स्तरांवरील अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षणविषयक कार्यक्रम चालविण्यासाठी जबाबदार असेल. तसेच तो घटक महाविद्यालयाचा प्राचार्यही असेल.

(३) सहयोगी अधिष्ठाता, या अधिनियमामध्ये घालून दिलेल्या व विहित करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती ठरविण्याची शक्ती. २३. या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, विद्यापीठाच्या सर्व कर्मचाऱ्यांची पदनामे, अर्हता सेवा-प्रवेशाची पद्धत, वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती व त्यांच्या शक्ती व कर्तव्ये ही, परिनियम व विनियम याद्वारे वेळोवेळी ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण ४

## विद्यापीठाची प्राधिकरणे

विद्यापीठाची प्राधिकरणे. २४. विद्यापीठाची पुढील प्राधिकरणे असतील :—

(एक) विधिसभा,

(दोन) कार्यकारी परिषद,

(तीन) विद्या परिषद,

(चार) विद्याशाखा,

(पाच) अभ्यास मंडळे,

(सहा) परिनियमांद्वारे विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून जाहीर करण्यात येतील अशा विद्यापीठाच्या इतर संस्था.

विधिसभा. २५. (१) विधिसभा ही पुढील सदस्यांची मिळून होईल :—

### १. पदसिद्ध सदस्य

### वर्ग—अ

(एक) कुलपती,
(दोन) प्रति-कुलपती,
(तीन) कुलगुरू,
(चार) विद्यापीठ शिक्षण संचालक,
(पाच) विद्यापीठ संशोधन संचालक,
(सहा) विद्यापीठ विस्तार शिक्षण संचालक,
(सात) विद्यापीठ विद्यार्थी कल्याण संचालक,
(आठ) विद्याशाखांचे अधिष्ठाते,

(दहा) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे प्राचार्य,
(अकरा) कुलसचिव,
(बारा) विद्यापीठ नियंत्रक.

प्रवर्ग—ब

(एक) कृषि राज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य,
(दोन) सचिव, महाराष्ट्र शासन, कृषि व सहकार विभाग,
(तीन) कृषि संचालक, महाराष्ट्र राज्य,
(चार) संचालक, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,
(पाच) कृषि पणन् व ग्रामीण वित्तव्यवस्था संचालक, महाराष्ट्र राज्य,
(सहा) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,
(सात) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,
(आठ) मत्स्यव्यवसाय संचालक, महाराष्ट्र राज्य,
(नऊ) आयुक्त, दुग्धशाळा विकास, महाराष्ट्र राज्य,
(दहा) मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य,
(अकरा) मुख्य अभियंता (पाटबंधारे), महाराष्ट्र राज्य,
(बारा) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ.

प्रवर्ग—क

राज्यातील इतर विद्यापीठांचे कुलगुरू

## २. इतर सदस्य

प्रवर्ग (अ)—राज्य विधानमंडळाने प्रतिनियुक्त करावयाचे—

(एक) महाराष्ट्र विधानपरिषदेने, आपल्या सदस्यांमधून, निवडून द्यावयाचे तीन सदस्य,

(दोन) महाराष्ट्र विधानसभेने, आपल्या सदस्यांमधून, निवडून द्यावयाचे सहा सदस्य.

प्रवर्ग (ब)—राज्य शासनाने नामनिर्दिष्ट करावयाचे—

(एक) चार कृषि पंडित व उद्यान पंडित,
(दोन) सहा प्रगत शेतकरी, त्यापैकी कमीत कमी एक अनुसूचित जमातीचा व कमीत कमी एक अनुसूचित जातीचा असेल,
(तीन) जनावरे, मेंढ्या व कुक्कुट यांची पैदास करणारे चार प्रगत पैदासकार,
(चार) चार महिला समाज कार्यकर्त्या,
(पाच) दोन प्रगत मच्छीमार,
(सहा) प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्व करणारे दोन सदस्य,
(सात) शेती सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्व करणारे दोन सदस्य,
(आठ) माध्यमिक शाळांमध्ये, कृषिविषय शिकविणाऱ्या, माध्यमिक शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,
(नऊ) कृषि मूलोद्योग शाळांमध्ये, कृषिविषय शिकविणाऱ्या, प्राथमिक शिक्षकांचे प्रतिनिधित्व

प्रवर्ग (क)—जिल्हा परिषदा, स्नातक, विद्यार्थी, विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि संस्था यांचे प्रतिनिधी—

(एक) जिल्हा परिषदांच्या कृषि समित्यांचे राज्य शासनाने नामनिर्दिष्ट करावयाचे तीन अध्यक्ष,

(दोन) प्रत्येक विद्याशाखेतील नोंदलेल्या स्नातकांनी आपल्यामधून विहित रीतीने निवडावयाचा एक सदस्य,

(तीन) स्नातकोत्तर विद्यार्थ्यांनी, आपल्यामधून, विहित रीतीने निवडावयाचा एक सदस्य,

(चार) मान्यताप्राप्त विद्यार्थी परिषदांच्या अध्यक्षांनी आपल्यामधून विहित रीतीने निवडावयाचा, स्नातकपूर्व विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,

(पाच) घटक, आणि संलग्न महाविद्यालयांमधील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील (प्राचार्यांखेरीज) विद्याविषयक कर्मचारीवर्गाचे प्रतिनिधित्व करणारे, अशा कर्मचारीवर्गातील व्यक्तींनी आपल्यामधून विहित रीतीने निवडावयाचे चार सदस्य,

(सहा) महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाने नामनिर्दिष्ट करावयाचा, ग्रामोद्योगासंबंधातील बाबींचे विशेष ज्ञान असलेला एक तज्ज्ञ,

(सात) मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँकेचे अध्यक्ष—पदसिद्ध,

(आठ) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष—पदसिद्ध,

(नऊ) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन संघाचे अध्यक्ष—पदसिद्ध.

प्रवर्ग (ड)—देणगीदार—

रुपये ५०,००० किंवा त्याहून अधिक रकमेची, रोख किंवा अन्य प्रकारे, देणगी देणाऱ्या व्यक्ती वा संस्था यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांनी, आपल्यामधून, विहित रीतीने निवडावयाचे दोन सदस्य.

(२) महाराष्ट्र विधानपरिषदेचे व विधानसभेचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य, ते उक्त विधानपरिषदेचे किंवा विधानसभेचे सदस्य असतील तोवर, पद धारण करतील. इतर सदस्य (पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त) पाच वर्षे मुदतीसाठी पद धारण करतील.

विधिसभेच्या सभा. २६. (१) विधिसभा, तिचे कामकाज करण्यासाठी प्रति-कुलपतींकडून ठरविण्यात येईल अशा तारखांना वर्षातून दोनदा भरेल ; अशा सभांना विधिसभेच्या अर्धवार्षिक सभा असे संबोधण्यात येईल.

(२) प्रति-कुलपतीस, त्यास योग्य वाटेल तेव्हा, विधिसभेची विशेष सभा भरविता येईल आणि त्याने, विधिसभेच्या तीसपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी मागणी केल्यावर, अशी सभा भरविली पाहिजे.

(३) प्रति-कुलपती, विधिसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल. पदवीदान समारंभासारख्या कोणत्याही विशेष प्रसंगी, कुलपती उपस्थित असेल तर तो विधिसभेच्या सभेत, अध्यक्ष म्हणून काम चालवील.

(४) कुलपती व प्रति-कुलपती अनुपस्थित असतील तर, कुलगुरू, विधिसभेच्या सभेत, अध्यक्ष म्हणून काम चालवील.

(५) कुलसचिव हा विधिसभेचा पदसिद्ध सचिव असेल.

२७. (१) या अधिनियमान्वये किंवा तदनुसार विहित करण्यात येतील अशा शर्तींस विधिसभेच्या अधीन राहून, विधिसभा पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्यांचे पालन करील :— शक्ती व कर्तव्य.

(एक) विद्यापीठापुढे कोणते कार्यक्रम असावेत त्याची स्थूल रूपरेषा आखणे;

(दोन) विद्यापीठाच्या वार्षिक अहवालावर चर्चा करणे व त्याची फेरपहाणी करणे व त्यावर सूचना करणे ;

(तीन) कार्यकारी परिषदेने तयार केलेल्या वार्षिक वित्तीय अंदाजावर विचारविनिमय करणे व त्यावर सूचना करणे ;

(चार) घटक महाविद्यालये, विभाग, वसतिगृहे, संशोधन केंद्रे, कृषिक्षेत्रे, शाळा, ग्रंथालये, प्रयोगशाळा, प्रात्यक्षिक केंद्रे स्थापन करणे व ती चालविणे व विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यासाठी इतर सुखसोयींची व्यवस्था करणे ;

(पाच) संशोधन करण्यासाठी व ज्ञानाच्या वाढीसाठी व प्रसारासाठी म्हणून तिला योग्य वाटतील अशा विद्याशाखांत व अभ्यासक्रमात, अध्यापनाची, शिक्षणाची व प्रशिक्षणाची तरतूद करणे ;

(सहा) परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, विद्यापीठास आवश्यक असणाऱ्या प्राध्यापकांची, सहयोगी प्राध्यापकांची, अधिव्याख्यात्यांची, प्रयोग निर्देशकांची पदे व संशोधन विशेषज्ञांची, विस्तार शिक्षण विशेषज्ञांची, शिक्षकांची इतर पदे, व तत्सम इतर पदे, सुरू करणे व चालू ठेवणे ;

(सात) परिनियम करणे, सुधारणे व ते रद्द करणे ;

(आठ) महाविद्यालये व स्नातकोत्तर संस्था यांच्या संलग्नीकरणास मान्यता देणे ;

(नऊ) उच्च विद्या व संशोधन संस्थांना मान्यता देणे व त्यांची मान्यता काढून घेणे ;

(दहा) अधिछात्रवृत्त्या (प्रवास अधिछात्रवृत्त्या धरून), शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या, पदके व पारितोषिके मंजूर करणे ;

(अकरा) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर शैक्षणिक विशेषोपाधी प्रदान करण्याबद्दल कुलपतीस शिफारस करणे ;

(बारा) सन्मान्य पदव्या किंवा इतर शैक्षणिक विशेषोपाधी मंजूर करणे ;

(तेरा) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील कर्मचारीवर्गाच्या वेतनश्रेणी व सेवेच्या शर्ती घालून देणे आणि त्यांचे पालन करण्यात येत आहे याबद्दल कार्यकारी परिषदेमार्फत खात्री करून घेणे.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (चार) ते (तेरा) खालील शक्तींचा वापर व अशा कर्तव्यांचे पालन, कार्यकारी परिषदेने केलेल्या शिफारशीवरून असेल त्याशिवाय, करण्यात येणार नाही.

२८. (१) कार्यकारी परिषद ही, विद्यापीठाचे कार्यकारी प्राधिकरण असेल व ती पुढील सदस्यांची मिळून होईल :— कार्यकारी परिषद.

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष ;

(दोन) कृषि संचालक किंवा त्याने सह-संचालक, कृषि, यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल, अशी नामनिर्दिष्ट करावयाची व्यक्ती ;

(तीन) पशुसंवर्धन संचालक किंवा त्याने सह-संचालक, पशुसंवर्धन, यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी, नामनिर्दिष्ट करावयाची व्यक्ती ;

(चार) भारतीय कृषि संशोधन परिषद, भारत सरकार, कृषि मंत्रालय (कृषि विभाग) यांचा एक प्रतिनिधी ;

(पाच) विद्यापीठाचे किंवा शासनाचे कर्मचारी नसतील असे, विधिसभेने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले आठ सदस्य ; उपरोक्त आठपैकी दोन सदस्य हे, जिल्हा परिषदांच्या कृषि समित्यांचे अध्यक्ष असतील ;

(सहा) विद्यापीठ शिक्षण, विद्यापीठ संशोधन व विस्तार शिक्षण यांचे तीन संचालक ;

(सात) विद्यापरिषदेने, आळीपाळीने निवडून दिलेला, विद्याशाखांचा एक अधिष्ठाता ;

(आठ) (संचालक व अधिष्ठात्यांखेरीज) विद्यापरिषदेने निवडून दिलेला, विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा एक सदस्य ;

(नऊ) राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेला, एक नामवंत कृषि वैज्ञानिक ;

कुलसचिव, कार्यकारी परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

(२) भारतीय कृषि संशोधन परिषदेचा प्रतिनिधी असलेला किंवा विद्यापरिषदेने निवडून दिलेला किंवा राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेला सदस्य, तीन वर्षांकरिता पद धारण करील. विधिसभेने निवडून दिलेला सदस्य, जोवर तो विधिसभेचा सदस्य असेल तोवर, पद धारण करील.

कार्यकारी परिषदेच्या शक्ती व कर्तव्ये.

२९. ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, कार्यकारी परिषद पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) विद्यापीठाचे वार्षिक वित्तीय अंदाज तयार करणे व त्यास अंतिम रूप देण्यापूर्वी विचारविनिमयासाठी विधिसभेकडे सादर करणे ;

(दोन) राज्य शासनाच्या मान्यतेने, विद्यापीठ मालमत्तेच्या तारणावर, विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी कर्ज घेणे ;

(तीन) परिनियमास अधीन राहून, विद्यापीठाच्या वतीने, मृत्युपत्रदाने, देणग्या आणि विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात आलेली कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता स्वीकारणे ;

(चार) विद्यापीठाच्या वतीने कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे हस्तांतरण करणे. असा व्यवहार जंगम मालमत्तेसंबंधी असेल तर विधिसभेकडे प्रतिवेदन करण्यात येईल ;

(पाच) विद्यापीठाची वित्तव्यवस्था, लेखे व (पैसे) गुंतवणूक याबाबत व्यवस्था ठेवणे व त्यांच नियमन करणे ;

(सहा) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे फी व इतर खर्च निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती स्वीकारणे ;

(सात) संलग्न महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त परिसंस्थांतील शैक्षणिक दर्जास मान्यता देणे व त्यांचे पालन करण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे ;

(आठ) (अ) ग्रामीण जनतेचे विस्तार शिक्षण ;

(ब) विद्यापीठाचे, संबंधित शासकीय विभागाचे आणि जिल्हा परिषदांचे कर्मचारी यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण ;

(क) शारीरिक व लष्करी प्रशिक्षण ;

(ड) क्रीडा व व्यायाम मंडळे ;

(इ) विद्यार्थ्यांचे कल्याण ;

यासाठी तरतूद करणे ;

(नऊ) संलग्न महाविद्यालयांच्या व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या तपासणीची व्यवस्था करणे व ती करण्याबद्दल निदेश देणे, त्यांची कार्यक्षमता राहावी आणि त्यांच्या कर्मचारीवर्गाच्या सेवेच्या योग्य शर्ती रहाव्यात म्हणून अनुदेश देणे; आणि अशा अनुदेशांकडे दुर्लक्ष करण्यात आल्यास त्यांच्या संलग्नीकरणाच्या किंवा मान्यता देण्यासंबंधीच्या शर्तीत फेरफार करण्याविषयी किंवा त्यास योग्य वाटेल अशी इतर उपाययोजना करण्याविषयी शिफारस करणे ;

(दहा) केवळ स्वतःशी संबंधित असलेल्या बाबींसाठी विनियम करणे, त्यांची सुधारणा करणे व ते रद्द करणे ;

(अकरा) विद्यापरिषदने केलेले विनियम स्वीकारणे, ते नामंजूर करणे किंवा परत पाठविणे ;

(बारा) परीक्षक नेमणे, त्यांचे पारिश्रमिक (कोणतेही असल्यास) ठरविणे आणि विद्यापीठाच्या परीक्षा व इतर चाचण्या घेण्याची व त्यांचे निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे ;

(तेरा) विद्यापीठाचे काम योग्य प्रकारे चालावे यासाठी तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे स्थायी किंवा तात्पुरत्या स्वरूपाची मंडळे व समित्या नेमणे व त्यांची प्रस्थापना, कामे व पदावधी निश्चित करणे;

(चौदा) आपल्या शक्तींपैकी कोणत्याही शक्ती, विनियमांद्वारे, कुलगुरूकडे किंवा तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे विद्यापीठाच्या किंवा मंडळाच्या किंवा तिने नियुक्त केलेल्या समितीच्या अधिकाऱ्याकडे सोपविणे;

(पंधरा) विद्यापीठाच्या सामाईक शिक्क्याचा नमुना ठरविणे, त्याच्या अभिरक्षेची तरतूद करणे आणि त्याच्या वापराचे नियमन करणे;

(सोळा) विद्यापीठाच्या व त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या महाविद्यालयांच्या व परिसंस्थांच्या विद्यार्थ्यांच्या आणि कर्मचारीवर्गाच्या गरजा भागविण्यासाठी, ग्राहक सहकारी संस्थांची तरतूद करणे;

(सतरा) ह्या अधिनियम व परिनियम यांद्वारे किंवा तदन्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा शक्तींचा वापर करणे व तिच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये बजाविणे;

(अठरा) ह्या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये अन्यथा ज्या शक्तींची तरतूद करण्यात आली नसेल अशा विद्यापीठाच्या सर्व शक्ती आणि ह्या अधिनियमाच्या किंवा परिनियमाच्या उपबंधांची बजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व शक्ती यांचा वापर करणे.

३०. (१) कुलगुरू ठरवील अशा तारखेस, दर दोन महिन्यांतून एकदा किंवा आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, त्यापेक्षा अधिक वेळा, कार्यकारी परिषदेची सभा भरविण्यात येईल. कार्यकारी परिषदेच्या सभा.

(२) कार्यकारी परिषदेच्या आठपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या सह्या असलेल्या लेखी मागणीवरून, कुलगुरू, अशी मागणी मिळाल्यापासून, एकवीस दिवसांच्या आत, परिषदेची विशेष सभा बोलवील.

(३) जेव्हा पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये कुलगुरू कार्यकारी परिषदेच्या सभेची तारीख निश्चित करील तेव्हा, कुलसचिव, अशा सभेची, पूर्ण दहा दिवसांची लेखी नोटीस परिषदेच्या सदस्यांना देईल.

३१. (१) विद्या परिषद ही विद्यापीठाचे सल्लागार मंडळ म्हणून काम करील आणि तिला सर्व विद्याविषयक, संशोधनविषयक व विस्तार शिक्षणविषयक बाबतीत, कुलगुरूला व कार्यकारी परिषदेला सल्ला देण्याचा अधिकार असेल. विद्या परिषद.

(२) विद्या परिषद पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,
(दोन) शिक्षण संचालक,
(तीन) संशोधन संचालक,
(चार) संचालक, विस्तार शिक्षण,
(पाच) विद्यार्थी कल्याण संचालक,
(सहा) विद्याशाखांचे अधिष्ठाते,
(सात) सहयोगी अधिष्ठाते,
(आठ) संलग्न महाविद्यालयाचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य,
(नऊ) विद्याशाखांचे विभाग प्रमुख,
(दहा) संशोधन केंद्राचे प्रभारी मुख्य संशोधन अधिकारी,
(अकरा) मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी,
(बारा) विद्याशाखेने निवडलेला विभाग प्रमुखाखेरीज प्रत्येक विद्याशाखेतील विद्याविषयक कर्मचारी वर्गाचा एक सदस्य,

(तेरा) विधिसभेने, जे विद्यापीठाचे किंवा शासनाचे कर्मचारी नसतील असे, आपल्या सदस्यांमधून निवडलेले दोन सदस्य,

कुलसचिव हा विद्यापरिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

(३) विद्यापरिषदेस, कृषिविषयक निरनिराळ्या क्षेत्रांचे योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व व्हावे म्हणून चारापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांना विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा रीतीने स्वीकृत करता येईल आणि अशा स्वीकृत सदस्यांना, परिषदेच्या कामकाजात भाग घेण्याचा व तसेच परिषदेच्या इतर सदस्यांप्रमाणे, मतदानाचा अधिकार असेल.

(४) परिषदेची सभा प्रत्येक तिमाही सत्राच्या प्रारंभापूर्वी निदान एकदा भरेल.

विद्या-परिषदेच्या शक्ती व कर्तव्ये.

३२. (१) ह्या अधिनियमाच्या उपबंधांद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, विद्यापरिषद, विद्यापीठातील पाठ्यक्रम, अभ्यासक्रम आणि अध्यापन, संशोधन व परिषदेच्या विस्तार शिक्षण पद्धती व त्यांचा दर्जा कायम राहण्यासाठी, त्यांचा अभ्यास करील व त्याबाबत शिफारशी करील.

(२) पूर्वगामी उपबंधाच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, विद्यापरिषद पुढील शक्तींचा वापर करील व पुढील कर्तव्ये बजावील :—

(एक) महाविद्यालये, विभाग, संशोधन केंद्रे, ग्रंथालये, प्रयोगशाळा, प्रात्यक्षिक केंद्रे यांची स्थापना आणि कृषि विकासाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल असे इतर काम, यासंबंधी प्रस्ताव करणे ;

(दोन) प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याते, प्रयोग निदेशक यांची पदे आणि विस्तार शिक्षण धरून संशोधन केंद्रातील पदे निर्माण करण्यासाठी व उक्त पदांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता, कर्तव्ये, वित्त-लब्धी व सेवेच्या इतर शर्ती यांसंबंधी कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे ;

(तीन) अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण या विभागांची रचना किंवा पुनर्रचना यासंबंधीच्या योजना करणे, त्यात फेरबदल करणे व त्यांचे पुनरीक्षण करणे ;

(चार) संबंधित विद्याशाखा व अभ्यासमंडळ यांच्याशी विचारविनिमय करून पदव्या, पदविका व प्रमाणपत्रे यांच्या अभ्यासक्रमाविषयी विनियम करणे ;

(पाच) विद्यापीठात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधी विनियम करणे ;

(सहा) विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांबाबत आणि ज्या शर्तींवर विद्यार्थ्यांना अशा परीक्षांना बसता येईल त्या शर्तींबाबत विनियम करणे ;

(सात) स्नातकोत्तर अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण याबाबत कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे ;

(आठ) विविध विद्याशाखांना विषय वाटून देण्यासंबंधी प्रस्ताव करणे ;

(नऊ) या अधिनियमाच्या उपबंधांद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात येतील किंवा सुपूर्द करण्यात येतील अशा इतर शक्तींचा वापर करणे व अशी इतर कर्तव्ये बजावणे.

विद्याशाखा.

३३. विद्याशाखा.—(१) विद्यापीठ पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही विद्याशाखा तसेच, परिनियमानुसार, वेळोवेळी प्रस्थापित करण्यात येतील अशा इतर विद्याशाखा चालू करील :—

विद्याशाखा.—(एक) कृषि (कृषि अर्थशास्त्र व पशुसंवर्धन धरून),

(दोन) पशुवैद्यकशास्त्र,

(तीन) कृषि तंत्रशास्त्र,

(चार) कृषि अभियांत्रिकी,

(पाच) गृहविज्ञान,

(सहा) मूलविज्ञान व मानवविज्ञान,

(सात) स्नातकोत्तर अभ्यासक्रम,

(आठ) विस्तार कृषि शिक्षण,

(नऊ) मत्स्यव्यवसाय (सागरी जीवशास्त्रासह),
(दहा) वनशास्त्र,

प्रत्येक विद्याशाखेचे विषय परिनियमांद्वारे निश्चित करण्यात येतील.

(२) विद्यापरिषदेच्या शिफारशींस व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, प्रत्येक विद्याशाखेकडे निरनिराळ्या शिक्षणविषयक अभ्यासक्रमांचे अध्यापन, संशोधन कार्य आणि विस्तार-शिक्षण कार्यक्रम यांचा कार्यभार राहील.

(३) प्रत्येक विद्याशाखेचा एक अधिष्ठाता असेल. विद्याशाखेचा तो मुख्य विद्याविषयक अधिकारी असेल व परिनियम व विनियम यांच्या यथोचित पालनास तो जबाबदार असेल. तो विद्याशाखेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(४) निम्न कृषि शिक्षण विद्याशाखेखेरीज, प्रत्येक विद्याशाखा पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) विद्याशाखेचा अधिष्ठाता—पदसिद्ध अध्यक्ष,
(दोन) विद्याशाखेतील सहयोगी अधिष्ठाते,
(तीन) विभाग प्रमुख,
(चार) विभागाच्या विद्याविषयक कर्मचारीवर्गातील सदस्यांनी निवडून द्यावयाचा, विभाग-प्रमुखाखेरीज प्रत्येक विभागाचा एक प्राध्यापक,
(पाच) मुख्य संशोधन अधिकारी,
(सहा) मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी,
(सात) संबंधित विद्याशाखेतील संलग्न महाविद्यालयाचे व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य,
(आठ) संबंधित गटाने निवडावयाचे, दोन सहयोगी प्राध्यापक व दोन अधिव्याख्याते.

निवडलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(५) निम्न कृषि शिक्षण शाखा पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) विद्याशाखेचा अधिष्ठाता—पदसिद्ध अध्यक्ष,
(दोन) विहित केलेल्या निम्न कृषि शिक्षण गटाचे प्रतिनिधित्व करणारे संबंधित गटातील संस्थांच्या प्रमुखांनी आपल्यामधून निवडलेले दोन सदस्य.

निवडलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(६) विस्तार शिक्षण कार्यकर्त्यांच्या योग्य प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यासाठी विद्याशाखेस शासनाचे संबंधित अधिकारी किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेचे अधिकारी सदस्य म्हणून स्वीकृत करता येतील; त्यांची संख्या आठपेक्षा अधिक असणार नाही आणि विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा रीतीने त्यांची निवड करण्यात येईल.

(७) प्रत्येक विद्याशाखेची सभा तिमाही सत्रात किमान एकदा भरेल, परंतु उक्त सभा, विद्या-परिषदेला विद्याशाखेच्या शिफारशींचा विचार करता यावा म्हणून, विद्यापरिषदेच्या सभेच्या पुरेशी अगोदर घेण्यात येईल.

३४. निर्णय घेण्याच्या बाबतीत, विद्याशाखा विद्यापरिषदेच्या अधीन असल्यातरीसुद्धा, विद्या-त्यांना सर्व प्रशासकीय व तांत्रिक बाबींचा विचार करता येईल व त्याबाबत परिषदेला शाखांच्या शिफारशी करता येतील. शक्य तेथवर, विद्यापरिषद निर्णयाच्या बाबतीत, संबंधित शक्ती व विद्याशाखेचे मार्गदर्शन घेईल. धोरणविषयक बाबी सोडून, प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, कर्तव्ये. विद्याशाखेने घेतलेल्या ठरावावर कुलगुरूस कळवून कार्यवाही करील. प्रत्येक विद्याशाखेस विहित करण्यात येईल अशा विषयासाठी व अशा रीतीने, अभ्यासमंडळाची रचना करता येईल व उक्त अभ्यासमंडळ हे विहित करण्यात येईल इतक्या सदस्यांचे मिळून होईल व ते विहित करण्यात येईल इतक्या मुदतीपर्यंत राहील. विद्याशाखेच्या इतर शक्ती व कर्तव्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण ५

### परिनियम आणि विनियम

परिनियम.

३५. या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, परिनियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(अ) विद्यापीठाच्या प्राधिकरणांची प्रस्थापना, शक्ती व कर्तव्ये, आणि इतर संस्था अशी प्राधिकरणे असल्याचे घोषित करणे ;

(ब) कुलगुरूंची वित्तलब्धी आणि त्याच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्याच्या शक्ती व कर्तव्ये ;

(क) विद्यापीठाच्या निरनिराळ्या श्रेणींतील कर्मचाऱ्यांची पदनामे, अर्हता, सेवाप्रवेशाची पद्धती, वेतन, भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्यांच्या शक्ती व कर्तव्ये ;

(ड) विद्याशाखांची रचना, पुनर्रचना किंवा त्या बंद करणे आणि त्यांच्या शक्ती व कर्तव्ये ;

(इ) विद्याशाखांमध्ये अध्यापन विभागांची स्थापना ;

(फ) सन्मान्य पदव्या आणि विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे व त्या काढून घेणे ;

(ग) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या फायद्याकरिता, निवृत्तिवेतन किंवा भविष्यनिर्वाह निधी किंवा विमा योजना, या सर्व किंवा यांपैकी एक किंवा एकापेक्षा अधिक योजना चालू करणे ;

(ह) संलग्न महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त परिसंस्थांतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याते, प्रयोगनिर्देशक आणि विद्याविषयक कर्मचारीवर्गातील इतर सदस्य यांची अर्हता ;

(आय) स्नातकांची नोंदणी करणे व नोंदलेल्या स्नातकांची नोंदवही ठेवणे ;

(जे) इतर विद्यापीठांच्या किंवा शैक्षणिक संस्थांच्या परीक्षांना, विद्यापीठाच्या परीक्षांच्या समतुल्य परीक्षा म्हणून, मान्यता देणे ;

(के) विधिसभेच्या सभांची कार्यपद्धती आणि तिचे कामकाज चालविणे ;

(ल) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब ;

(म) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतीही बाब.

परिनियम कसे करण्यात येतील ते.

३६. (१) विद्यापीठ कार्यक्षम रीत्या चालण्यासाठी आवश्यक असतील असे आणि विधिसभेची प्रस्थापना करण्यापूर्वी करण्यात यावयाचे, कलम ३५ मध्ये दिलेल्या बाबींसंबंधातील, पहिले परिनियम हे, राज्य शासनाच्या मान्यतेने, पहिल्या कुलगुरूकडून करण्यात येतील.

(२) विधिसभेस, या कलमात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने, वेळोवेळी, नवीन किंवा अतिरिक्त परिनियम करता येतील किंवा त्यात सुधारणा करता येईल किंवा ते रद्द करता येतील.

(३) विधिसभेस, स्वतःहून किंवा कार्यकारी परिषदेने प्रस्ताव केल्यानंतर, परिनियमाचा मसुदा विचारात घेता येईल. कार्यकारी परिषदेने तयार केलेला नसेल अशा मसुद्याच्या बाबतीत, विधिसभा, उक्त मसुदा विचारात घेण्यापूर्वी, कार्यकारी परिषदेचा अभिप्राय मागवील :

परंतु, मसुदा मिळाल्याच्या तारखेपासून, तीन महिन्यांच्या आत, कार्यकारी परिषदेने आपला अभिप्राय सादर करण्यात कसूर केली तर, विधिसभेस मसुदा विचारात घेण्यासंबंधी कार्यवाही करता येईल.

(४) विधिसभेच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही परिनियमाच्या मसुद्यासंबंधात, विधिसभेस आवश्यक वाटल्यास, तिला विद्यापीठाच्या कोणत्याही इतर प्राधिकरणाचा अभिप्राय घेता येईल.

(५) विधिसभेने मंजूर केलेला प्रत्येक परिनियम, कुलपतीस सादर करण्यात येईल व त्यास त्यावर आपली संमती देता येईल किंवा संमती रोखून धरता येईल किंवा पुनर्विचारासाठी तो विधिसभेकडे परत पाठविता येईल.

(६) कुलपती संमती देईपर्यंत, विधिसभेने संमत केलेला कोणताही परिनियम, वैध असणार नाही किंवा अंमलात येणार नाही.

३७. (१) कार्यकारी परिषद, विद्यापरिषद आणि विद्याशाखा यांना, हा अधिनियम व त्या अन्वये करण्यात आलेले परिनियम यांच्याशी सुसंगत असतील असे, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधी विनियम करता येतील :— विनियम.

(अ) त्यांच्या सभांमध्ये (गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली संख्या धरून) अनुसरावयाची आणि त्यांचे कामकाज चालविण्याची कार्यरीती ;

(ब) हा अधिनियम किंवा परिनियम यानुसार ज्या बाबींची विनियमाद्वारे तरतूद करणे आवश्यक असेल अशा बाबींची तरतूद ;

(क) केवळ प्राधिकरणाशी संबंधित असतील अशा सर्व बाबींची किंवा अशा प्राधिकरणाच्या मते, या अधिनियमाखालील किंवा परिनियमाखालील त्यांच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ज्या बाबींची तरतूद करणे आवश्यक असेल अशा बाबींची तरतूद ;

(२) विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण, उक्त प्राधिकरणाच्या सदस्यांना, सभांच्या तारखांबद्दल आणि सभांमध्ये चालविण्यात येईल अशा कामकाजाबद्दल आणि सभांच्या कामकाजाचे अभिलेख ठेवण्याबद्दल, सूचना देण्याची तरतूद करणारे विनियम करील ;

(३) विद्यापरिषदेस, परिनियमाच्या उपबंधांस आणि कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाचे अभ्यासक्रम, परीक्षांची पद्धत व पदव्या व पदविका यांची तरतूद करण्यासाठी संबंधित विद्याशाखेकडून त्यांचे मसुदे मिळाल्यानंतर, विनियम करता येतील ;

(४) विद्यापरिषदेस, विद्याशाखेकडून मिळालेल्या मसुद्यात फेरबदल करता येणार नाही, परंतु तो नाकारता येईल किंवा विद्यापरिषदेच्या सूचनांसह, आणखी विचारविनिमयासाठी तो विद्याशाखेकडे परत पाठविता येईल ;

(५) कार्यकारी परिषदेस, ती बिनिर्दिष्ट करील अशा रीतीने, या कलमान्वये कोणत्याही प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही विनियमात सुधारणा करण्याबद्दल किंवा अशा कोणत्याही विनियमाच्या विलोपनाबद्दल निदेश देता येईल ; तथापि, अशा कोणत्याही सुधारणेमुळे किंवा विलोपनामुळे उक्त विनियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

## प्रकरण ६

### संलग्नीकरण आणि मान्यता

३८. (१) (अ) हा अधिनियम अमलात येईल त्या तारखेस शासकीय महाविद्यालय किंवा शैक्षणिक संस्था सोडून कृषि क्षेत्रातील पदवी किंवा पदविकांच्या स्तरावरील शिक्षण देणारे विद्यापीठ अधिक्षेत्रातील कोणतेही महाविद्यालय किंवा इतर शैक्षणिक संस्था, राज्यात विधिद्वारा प्रस्थापित केलेल्या कोणत्याही विद्यापीठाशी सहयोगी असेल किंवा त्याच्या विशेषाधिकाराचा लाभ घेत असेल तर यथास्थिति, असा सहयोग किंवा विशेषाधिकाराचा लाभ अशा संस्थेच्या संबंधात अशा तारखेपासून बंद होईल आणि अशा तारखेपासून, अशा सर्व संस्थांना, विद्यापीठाच्या विशेषाधिकारांचा लाभ घेण्यास परवानगी दिली असल्याचे मानण्यात येईल आणि विद्यापीठ, अशा सर्व संस्थांना, अशा तारखेच्या लगतपूर्वी, इतर विद्यापीठांकडून मिळत असतील अशा सर्व विशेषाधिकारांचा लाभ घेण्यास, शक्य असेल तेथवर व या अधिनियमाशी सुसंगत राहून, परवानगी देईल. महाविद्यालयांचे संलग्नीकरण.

(ब) अशा तारखेनंतर, कृषि विषयातील पदवीच्या किंवा पदविकेच्या स्तरापर्यंतचे शिक्षण देणारे विद्यापीठ अधिक्षेत्रातील कोणतेही महाविद्यालय किंवा इतर संस्था, राज्य शासनाच्या मंजुरीने असेल त्याखेरीज, राज्यात विधिद्वारा स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाशी, कोणत्याही प्रकारे सहयोगी राहणार नाही किंवा त्या विद्यापीठाचा कोणताही विशेषाधिकार घेण्याचा प्रयत्न करणार नाही.

9५०६



(२) विद्यापीठाशी संलग्नीकरण केले जाण्याबद्दल अर्ज करणाऱ्या महाविद्यालयाने, आपला अर्ज कुलसचिवाकडे पाठविला पाहिजे आणि त्याने कार्यकारी परिषदेची व विद्यापरिषदेची पुढील गोष्टींबाबत खात्री पटविली पाहिजे :—

(अ) महाविद्यालयाकडून ज्या प्रकारच्या शिक्षणाची सोय करण्यात येत असेल किंवा सोय करण्याचा त्याचा इरादा असेल त्याप्रकारचे शिक्षण, जवळपासच्या इतर महाविद्यालयांनी त्याच प्रकारच्या शिक्षणासाठी केलेली विद्यमान सोय आणि जेथे महाविद्यालय स्थापन केलेले असेल किंवा करण्यात येणार असेल त्या जागेची योग्यायोग्यता या गोष्टी लक्षात घेता, ते महाविद्यालय त्या ठिकाणची गरज भागवील ;

(ब) महाविद्यालय, रीतसर प्रस्थापित करण्यात आलेल्या नियामक मंडळाच्या व्यवस्थापनाखाली राहील ;

(क) अध्यापकवर्गाची संख्या व त्यांची अर्हता आणि त्यांच्या पदावधीसंबंधीच्या शर्ती अशा आहेत की, ज्यामुळे महाविद्यालयात सुरू करावयाचा शिक्षणक्रम, अध्यापन, संशोधन व प्रशिक्षण याबाबत योग्य ती सोय करता येईल ;

(ड) ज्या इमारतींमध्ये महाविद्यालय राहील त्या इमारती योग्य आहेत आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निवासासंबंधी, विनियमांशी सुसंगत असेल अशा प्रकारची तरतूद करण्यात येईल;

(इ) परिनियमांशी व विनियमांशी सुसंगत असेल असे योग्य त्या सोयी असलेले पुरेशा आकाराचे कृषिक्षेत्र, संशोधनाकरिता व विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणाकरिता, महाविद्यालयाच्या ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास उपलब्ध आहे;

(फ) ग्रंथालय आणि प्रयोगशाळा यांच्यासाठी योग्य ती तरतूद करण्यात आलेली आहे किंवा करण्यात येईल ;

(ग) परिस्थितीनुसार शक्य असेल तेथवर, महाविद्यालयात किंवा जवळपास किंवा विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करण्यात आलेल्या जागेत, प्राचार्य व अध्यापकवर्गातील काही जणांची राहण्याची योग्य ती सोय करण्यात येईल ;

(ह) महाविद्यालयांची वित्तीय साधने अशी आहेत की, त्यामुळे महाविद्यालय कायम चालू राहण्यासाठी व ते कार्यक्षम होण्यासाठी योग्य ती तरतूद होईल ;

(आय) विद्यार्थ्यांनी द्यावयाची फी (कोणतीही असल्यास) ठरविण्याबाबत महाविद्यालयाने तयार केलेले नियम असे नाहीत की, ज्यामुळे जवळपासच्या कोणत्याही विद्यमान महाविद्यालयाशी शैक्षणिक हिताच्या दृष्टीने बाधक होईल अशी स्पर्धा निर्माण होईल.

अर्जात आणखी असेही आश्वासन देण्यात आले पाहिजे की, महाविद्यालय संलग्न करून घेण्यात आल्यानंतर, व्यवस्थापनात होणारे कोणतेही हस्तांतरण आणि अध्यापकवर्गात झालेले सर्व बदल तसेच ज्यायोगे उपरोल्लिखित आवश्यक गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट पुरी केली जाणार नाही किंवा पुरी करण्याचे चालू ठेवले जाणार नाही असे इतर सर्व बदल, कार्यकारी परिषदेस ताबडतोब कळविण्यात येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये केलेला अर्ज मिळाल्यानंतर, कार्यकारी परिषद —

(अ) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टींसंबंधी आणि आवश्यक व संबद्ध वाटतील अशा इतर गोष्टींसंबंधी, कार्यकारी परिषदेने प्राधिकृत केलेल्या सक्षम व्यक्तीने किंवा व्यक्तींनी स्थानिक चौकशी करावी असा निदेश देईल ;

(ब) तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करील ;

(क) अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर करावा की नामंजूर करावा या प्रश्नावर विद्यापरिषदेशी विचारविनिमय करून आणि खंड (अ) व (ब) अन्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचे निष्कर्ष नमूद करून आपल्या मताची नोंद करील ;

(ड) सर्व अटी पूर्ण केल्या असल्यास आपल्या शिफारशी आणि कामकाजाचे कागदपत्र यांसह तो अर्ज विधिसभेकडे पाठवील.

(४) विधिसभेस, तिला आवश्यक वाटेल त्या चौकशीनंतर, तो अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर किंवा नामंजूर करता येईल. जेव्हा अर्ज किंवा त्याचा कोणताही भाग मंजूर करण्यात आला असेल

तेव्हा, विधिसभेच्या निर्णयात ज्या शिक्षणक्रमांकरिता महाविद्यालय संलग्न करून घेण्यात आले असेल ते शिक्षणक्रम विनिर्दिष्ट करण्यात येतील आणि अर्ज किंवा त्याचा कोणताही भाग नामंजूर करण्यात आला असेल तेव्हा, तो अशा रीतीने नामंजूर करण्याबद्दलची कारणे नमूद करण्यात येतील.

(५) पोट-कलम (२) अन्वये केलेला अर्ज, पोट-कलम (४) अन्वये निर्णय घेण्यात येण्यापूर्वी, कोणत्याही वेळी, मागे घेता येईल.

(६) ज्या पाठ्यक्रमाच्या संबंधात महाविद्यालय संलग्न करून घेण्यात आले असेल त्या पाठ्यक्रमात वाढ करण्याची महाविद्यालयाची इच्छा असेल त्या बाबतीत, पोट-कलमे (२) ते (५) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती, शक्यतोवर, अनुसरण्यात येईल.

(७) कोणत्याही संलग्न महाविद्यालयास घटक महाविद्यालय व्हावयाचे असेल त्याबाबतीत, त्या महाविद्यालयाने, आपल्या अटी व शर्तींसह, कोणत्याही असल्यास, कुलसचिवाकडे आवेदनपत्र पाठविले पाहिजे. अशा अर्जाचा कार्यकारी परिषद विचार करील व अशी परिषद, विधिसभेच्या संमतीने, असा अर्ज मंजूर किंवा नामंजूर करावा किंवा कसे याविषयी आणि असा अर्ज महाविद्यालय व विद्यापीठ आपसात कबूल होतील अशा ज्या अटी व शर्ती यांच्या अधीन मंजूर करावयाचा असेल. त्या अटी व शर्ती याविषयी राज्य शासनाकडे शिफारस करील. राज्य शासनास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कार्यकारी परिषदेने शिफारस केलेल्या अटी व शर्ती यांत जे फेरफार करणे त्यास आवश्यक वाटेल असे कोणतेही फेरफार असल्यास, त्यांना अधीन राहून, अर्ज मंजूर किंवा नामंजूर करता येईल. अर्ज मंजूर करण्यात आला तर, असे महाविद्यालय हे घटक महाविद्यालय होईल आणि राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा तारखेस आणि तारखेपासून, ते, विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली घेण्यात येईल.

**संशोधनाच्या व विशेषीकृत अभ्यासांच्या परिसंस्थांना मान्यता.**

३९. (१) विधिसभेस, कार्यकारी परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, प्रगत पदव्यांच्या संशोधनाच्या विद्यापीठाच्या गरजा अंशतः पूर्ण करण्यासाठी, विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या संशोधन किंवा विशेषीकृत अभ्यास परिसंस्थांना, शिक्षणाची व संशोधनाची सोय करणाऱ्या परिसंस्था म्हणून मान्यता देण्याची शक्ती असेल.

(२) ह्या कलमान्वये मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणारी परिसंस्था, आपले आवेदनपत्र कुलसचिवास पाठवील आणि अशा पत्रात पुढील बाबींसंबंधी संपूर्ण माहिती देण्यात येईल :—

(अ) व्यवस्थापन मंडळाची रचना व त्यातील कर्मचारीवर्ग ;

(ब) ज्या विषयांच्या व पाठ्यक्रमांच्या संबंधात मान्यता मिळवावयाची असेल असे विषय व पाठ्यक्रम ;

(क) जागा, साधनसामग्री व ज्यांची सोय करण्यात आली असेल अशा किंवा सोय करण्याचे योजिले असेल अशा विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांच्या अर्हता व वेतने आणि त्यांनी केलेले संशोधन कार्य ;

(ई) आकारण्यात येणारी किंवा आकारण्याचे योजिलेली फी आणि इमारती, जमिनी व साधनसामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी व परिसंस्थेच्या सतत परिरक्षणासाठी व कार्यक्षम कामकाजासाठी केलेली वित्तीय तरतूद.

(३) पोट-कलम (२) अन्वये पाठविलेले पत्र पोचल्यावर, कार्यकारी परिषद —

(अ) याबाबत तिने प्राधिकृत केलेली किंवा केलेल्या सक्षम व्यक्ती यांनी स्थानिक चौकशी करावी असा निदेश देईल ;

(ब) तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करील ;

(क) असा अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर किंवा नामंजूर करण्यात यावा या प्रश्नावर विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, खंड (अ) व (ब) अन्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचे निष्कर्ष नमूद करून, आपल्या मताची नोंद करील ;

(ड) मान्यता संपूर्णतः किंवा अंशतः देण्याची किंवा नाकारण्याची शिफारस विधिसभेला करील व त्यावर विधिसभा, तिला योग्य वाटेल असा निर्णय घेईल.

९८५



महाविद्यालयाची व परिसंस्थांची तपासणी व अहवाल.

४०. (१) विद्यापीठाच्या गरजांच्या बाबतीत त्या महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची कार्यक्षमता व आवश्यकता अजमावणे शक्य व्हावे यासाठी कार्यकारी परिषदेस आवश्यक वाटतील असे अहवाल, व विवरणे आणि इतर माहिती, प्रत्येक संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था पुरविल.

(२) कार्यकारी परिषद, याबाबतीत ती प्राधिकृत करील अशा एक किंवा अधिक सक्षम व्यक्तींकडून, वेळोवेळी, अशा प्रत्येक महाविद्यालयाची किंवा परिसंस्थेची तपासणी करवील.

(३) कार्यकारी परिषदेस, लगतपूर्ववर्ती दोन कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात, तिला आवश्यक वाटेल अशी कार्यवाही, विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, करण्याबद्दल कोणत्याही संलग्न महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस फर्माविता येईल.

संलग्नीकरण काढून घेणे.

४१. (१) एखाद्या महाविद्यालयाने, कलम ३८, पोट-कलम (२) च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा त्याच्या संलग्नीकरणाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा कृषि शिक्षणाच्या हितसंबंधास बाध येईल अशा रीतीने ते महाविद्यालय चालविण्यात येत असेल तर, संलग्नीकरणामुळे अशा महाविद्यालयास देण्यात आलेले अधिकार, संपूर्णत: किंवा अंशत:, काढून घेता येतील किंवा त्यात फेरफार करता येतील.

(२) असे अधिकार काढून घेण्याचा किंवा त्यात फेरफार करण्याचा प्रस्ताव फक्त विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेत प्रथम मांडण्यात येईल. असा प्रस्ताव मांडण्याचा इरादा असलेला परिषदेचा सदस्य, त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांसाठी तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) उक्त प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी, कार्यकारी परिषद, पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशीची व लेखी निवेदनाची प्रत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यास पाठवील व त्यासोबत, अशी सूचना पाठवील की, निवेदनात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत महाविद्यालयाच्या वतीने सादर केलेले लेखी अभिवेदन कार्यकारी परिषद विचारात घेईल :

परंतु, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेली मुदत, आवश्यक वाटल्यास, कार्यकारी परिषदेस वाढविता येईल.

(४) असे अभिवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत संपल्यावर, कार्यकारी परिषद, प्रस्तावाची नोटीस, निवेदन व अभिवेदन यांचा विचार केल्यानंतर आणि कार्यकारी परिषदेने त्याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सक्षम व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून तीला आवश्यक वाटेल अशी तपासणी व आणखी चौकशी केल्यानंतर आणि विद्यापरिषदेशी विचार-विनिमय केल्यानंतर, त्याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विधिसभेस शिफारस करील.

(५) लगतपूर्ववर्ती पोट-कलमान्वये कोणताही प्रस्ताव मिळाल्यानंतर, विधिसभा, त्याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीवर निर्णय घेईल. विधिसभेने संलग्नीकरण पूर्णत: किंवा अंशत: काढून घेण्याचे ठरविले तर, ज्या कारणांसाठी संलग्नीकरण अशा रीतीने काढून घेण्यात यावयाचे असेल ती कारणे, त्या प्रयोजनार्थ संमत केलेल्या विधिसभेच्या ठरावात नमूद करण्यात येतील.

मान्यता काढून घेणे.

४२. (१) एखाद्या परिसंस्थेने तिच्या मान्यतेच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा कृषि शिक्षण किंवा संशोधन यांच्या हितसंबंधास बाध येईल अशा रीतीने परिसंस्था चालविण्यात येत असेल तर, मान्यतेमुळे अशा परिसंस्थेस देण्यात आलेले अधिकार विधिसभेस काढून घेता येतील किंवा कोणत्याही मुदतीपर्यंत तहकूब करता येतील.

(२) अशा रीतीने अधिकार काढून घेण्याचा किंवा तहकूब करण्याबाबतचा प्रस्ताव, केवळ कार्यकारी परिषदेतच प्रथम मांडण्यात येईल. असा प्रस्ताव मांडण्याचा इरादा असलेला कार्यकारी परिषदेचा सदस्य त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांमुळे तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) उक्त प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी कार्यकारी परिषद, पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशीची व लेखी निवेदनाची प्रत, संबंधित परिसंस्थेच्या प्रमुखास पाठवील व त्यासोबत, कोणत्याही अभिवेदनात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत परिसंस्थेच्या वतीने सादर केलेले लेखी अभिवेदन कार्यकारी परिषद विचारात घेईल, अशी सूचना पाठवील :

परंतु अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेली मुदत, आवश्यक वाटल्यास, कार्यकारी परिषदेस वाढविता येईल.

(४) असे अभिवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत संपल्यावर कार्यकारी परिषद, प्रस्तावाची नोटीस, निवेदन व अभिवेदन यांचा विचार केल्यानंतर आणि तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर आणि विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर त्याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विधिसभेस शिफारस करील. असा प्रस्ताव मिळाल्यानंतर विधिसभा त्याबाबतीत निर्णय घेईल. विधिसभेने मान्यता काढून घेण्याचे ठरविले तर ज्या कारणांसाठी मान्यता अशा रीतीने काढून घेण्यात आली असेल ती कारणे, त्या प्रयोजनार्थ संमत केलेल्या विधिसभेच्या ठरावात नमूद करण्यात येतील.

## प्रकरण ७

### अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण

४३. (१) विद्यापीठ आपल्या मुख्यालयाच्या ठिकाणी, विद्यापीठ क्षेत्रात पुढीलपैकी सर्व किंवा कोणतीही महाविद्यालये व अशा इतर परिसंस्था एकाशेजारी एक व त्यांच्याच जवळ, मूलभूत आणि उपयोजित संशोधनासाठी मध्यवर्ती प्रयोग केंद्र यांची स्थापना करील :— महाविद्यालये व विद्यापीठाच्या इतर परिसंस्था.

(एक) कृषि महाविद्यालय (कृषि अर्थशास्त्र व पशुसंवर्धनधरून).
(दोन) पशुवैद्यकशास्त्र महाविद्यालय.
(तीन) कृषि तंत्रविज्ञान महाविद्यालय.
(चार) कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय.
(पाच) गृहविज्ञान महाविद्यालय.
(सहा) मूलविज्ञान व मानवविज्ञान महाविद्यालय.
(सात) स्नातकोत्तर अभ्यास परिसंस्था.

(२) विद्यापीठ क्षेत्राशिवाय, विद्यापीठ ठरवील अशा विद्यापीठ अधिक्षेत्राच्या कोणत्याही भागातील महाविद्यालये, परिसंस्था यांमध्ये किंवा इतर ठिकाणी विद्यापीठाचा कार्यक्रम पार पाडता येईल.

(३) विद्यापीठ स्नातकपूर्व व त्याचप्रमाणे स्नातकोत्तर प्रशिक्षणाची तरतूद करील व महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांचे क्रमशः एकात्मीकरण केले जाऊन काटकसर होईल आणि अध्यापन व संशोधन यांची कार्यक्षमता राखली जाईल याबद्दल खात्री करून घेईल.

(४) स्नातकोत्तर अध्यापन व संशोधन, शक्यतोवर, स्नातकोत्तर अभ्यास परिसंस्थेच्या ठिकाणीच चालविण्यात येईल.

४४. विद्यापीठाच्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा प्रत्येक सदस्य, त्याच्या अर्हता व त्याचा दर्जा याच्याशी सुसंवादी असे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता किंवा प्रयोगनिर्देशक हे किंवा इतर कोणतेही विहित पद धारण करील ; मग त्यावेळी त्यास नेमून देण्यात आलेली अध्यापनाची, संशोधनाची किंवा विस्तार शिक्षणाची कर्तव्ये कोणतीही असोत. विद्यापीठाचा विद्याविषयक कर्मचारीवर्ग.

४५. (१) विद्यापीठ वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे विद्यापीठाची घटक व संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे अध्यापन व रचना या गोष्टी क्रमशः समान धर्तीवर आणण्यात येतील. अध्यापन कार्यक्रम.

(२) विद्यापीठ निरनिराळ्या विद्याशाखांच्या गरजा भागविण्याकरिता, गरजेनुसार, जादा महाविद्यालये व परिसंस्था प्रस्थापित करील.

(३) कलम ७ अन्वये विद्यापीठाने घेतलेल्या परिसंस्था, विद्यापीठास योग्य वाटेल अशा रीतीने आणि त्यास योग्य वाटतील असे फेरबदल करून घटक प्रशिक्षण परिसंस्था म्हणून त्याच्याकडून चालविण्यात येतील.

(४) विद्यापीठ, गरजेनुसार, जादा प्रशिक्षण केंद्रे चालू करील किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही प्रशिक्षण संस्था किंवा वर्ग, कायम किंवा तात्पुरते बंद करील.

संशोधन कार्यक्रम.

४६. (१) विद्यापीठ, संशोधन सेवा प्रस्थापित करील. विद्यापीठाने, कलम ७ ची पोट-कलमे (४)-व-(६) अन्वये घेतलेली संशोधन व प्रयोग केंद्रे, विद्यापीठास योग्य वाटेल अशा रीतीने आणि असे योग्य ते फेरबदल करून, विद्यापीठाकडून, त्याच्या घटक संशोधन संस्था म्हणून चालविण्यात येतील.

(२) विद्यापीठ, विद्यमान कृषि महाविद्यालयांच्या ठिकाणी विभागीय संशोधन केंद्रे प्रस्थापित करील आणि विद्यापीठ अधिक्षेत्रातील योग्य त्या ठिकाणी, मूलभूत व उपयोजित अशा दोन्ही प्रकारच्या संशोधनासाठी, विद्यापीठास योग्य वाटेल अशी, जादा प्रयोग केंद्रे प्रस्थापित करील.

(३) विद्यापीठास, कोणत्याही वेळी, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, संशोधन केंद्रांपैकी कोणतीही संशोधन केंद्रे, कायम किंवा तात्पुरती बंद करता येतील, त्यांत कपात करता येईल किंवा त्यांचा विस्तार करता येईल.

विस्तार शिक्षण कार्यक्रम.

४७. विद्यापीठ, कृषि विस्तार शिक्षण सेवा प्रस्थापित करील आणि या अधिनियमाच्या आणि परिनियमांच्या उपबंधांस अधीन राहून, संशोधनाच्या निष्कर्षांवर आधारित असलेली उपयुक्त माहिती ग्रामीण क्षेत्रातील शेतकऱ्यांना व इतर लोकांना त्यांच्या समस्या सोडविण्यास सहाय्य करण्यासाठी उपलब्ध करून देईल. विद्यापीठ, विद्यमान कृषि महाविद्यालयांच्या ठिकाणी, प्रादेशिक विस्तार शिक्षण पथके प्रस्थापित करून, विद्यार्थी, विस्तार कार्यकर्ते, शेतकरी आणि इतर ग्रामीण लोक यांच्या फायद्यासाठी प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यक्रम चालवील. कृषि उत्पादन वाढविणे हा सर्व विस्तार कार्याचा मुख्य उद्देश राहील आणि या कार्याचा विद्यापीठाच्या आणि विद्यापीठ अधिक्षेत्राच्या इतर समुचित अभिकरणाच्या इतर कार्यांशी समन्वय करण्यात येईल.

अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण यांचा समन्वय आणि कार्ये व शिक्षणक्रम आणि सेवा यांचे एकत्रीकरण.

४८. (१) विद्यापीठाच्या समुचित अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून, कुलगुरू, विद्यापीठाच्या अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण कार्य याच्या पूर्ण समन्वयासाठी, आवश्यक असेल अशी, उपाययोजना करण्यास जबाबदार असेल.

(२) विद्यापीठाचे समुचित अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्यामार्फत काम करीत असताना, कुलगुरू, कृषिविज्ञानाशी ज्यांचा संबंध येत असेल असे सृष्टिविज्ञान, भौतिक व समाजविज्ञान यातील नवीन माहिती व तंत्रविज्ञान यांच्या विकासात ज्याद्वारे शक्य तितकी जास्तीत जास्त प्रगती करण्यात येईल अशी परिस्थिती निर्माण करण्यास व अध्यापन, अभ्यासक्रमाकडे व विद्यापीठ अधिक्षेत्रात जेथे व्यवहारात त्यांचा उपयोग करता येण्याजोगा असेल तेथे त्यांचे आकलन व अंगीकार यासाठी असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाकडे हस्तांतरण करण्यास जबाबदार असेल.

(३) विद्यापीठाचे समुचित अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्यामार्फत काम करीत असताना कुलगुरू, विद्यापीठाच्या विद्याशाखांमधील कार्याची अनावश्यक द्विरावृत्ती टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पाठ्यक्रम पुरविण्यासाठी व विद्यापीठाची द्रव्यसाधने व प्रज्ञा यांद्वारे शक्य असेल तेथवर विद्याशाखांमध्ये संपर्क साधण्यासाठी, विद्यापीठाच्या निरनिराळ्या विद्याशाखांमध्ये देण्यात येणारे पाठ्यक्रम व अभ्यासक्रम यांच्यामध्ये समुचित असे परस्पर संबंध प्रस्थापित करण्यास जबाबदार असेल.

(४) सामान्यत: राज्याच्या गरजा लक्षात घेऊन, विद्यापीठ, त्याच्या संशोधनाच्या आणि विस्तार शिक्षणाच्या कार्यक्रमाचा विकास करील आणि विशेषत: विद्यापीठ अधिक्षेत्रातील कृषि विकास कार्यात गुंतलेल्या राज्य शासनाच्या विभागांस योग्य तो तांत्रिक पाठिंबा आणि सल्लागार सल्ला देईल.

## प्रकरण ८

### वित्त व्यवस्था

४९. (१) विद्यापीठ, विद्यापीठ निधी या नावाचा एक निधी प्रस्थापित करील. **विद्यापीठ निधी.**

(२) पुढील रकमा विद्यापीठ निधीचा भाग ठरतील किंवा त्या, विद्यापीठ निधीच्या खाती जमा करण्यात येतील :—

(अ) शासनाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा अनुदान ;

(ब) फी व आकार यांपासून येणारे उत्पन्न धरून, सर्व साधनांपासून येणारे विद्यापीठाचे उत्पन्न व शेती उत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न ;

(क) विद्यापीठास मिळालेली मृत्यूपत्रदाने, देणग्या, दाने आणि इतर अनुदाने, कोणतीही असल्यास.

(३) विद्यापीठाचा एक आकस्मिकता निधी असेल व तो निधी, विद्यापीठाच्या लेख्यातील एका वेगळ्या शीर्षाखाली ठेवण्यात येईल आणि त्यात, शासन विशेषत: ह्या प्रयोजनार्थ अंशदाने किंवा अनुदाने म्हणून वेळोवेळी मंजूर करील अशा रकमा जमा करण्यात येतील. असा निधी प्रारंभीचा खर्च भागविण्यासाठी आणि त्यानंतर अनपेक्षित खर्च भागविण्याच्या प्रयोजनांकरिता आगाऊ रकमा देण्यासाठी वापरण्यात येईल.

(४) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, विद्यापीठ निधीचा कोणताही भाग, वेळोवेळी, विद्यापीठ, विद्यापीठाच्या लेख्यातील वेगळ्या शीर्षाखाली जमा करील. परंतु, अशा रीतीने ज्या उद्देशांनी विशेष निधी उभारण्यात आला असेल त्या उद्देशांशी स्पष्टपणे संबंधित असतील अशाच रकमा अशा विशेष शीर्षाखाली जमा किंवा खर्च खाती टाकण्यात येतील.

(५) विद्यापीठ निधी हा, कार्यकारी परिषदेच्या स्वेच्छानिर्णयानुसार, भारताच्या स्टेट बँकेत किंवा भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेली जी कोणतीही अनुसूचित बँक, बँकांच्या नियमनाबाबत अधिनियम, १९४९ याचे कलम २२ अन्वये भारताच्या रिझर्व्ह बँकेने दिलेली अनुज्ञप्ती धारण करीत असेल अशा बँकेत किंवा त्या कारणासाठी, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत ठेवण्यात येईल किंवा तो भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १८८२ अन्वये प्राधिकृत केलेल्या तारणपत्रांमध्ये किंवा पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही संलग्न महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रयोजनांसाठी प्रस्थापित करण्यात आलेल्या ग्राहक सहकारी संस्थांच्या शेअर्समध्ये किंवा त्यांना कर्ज देऊन गुंतविण्यात येईल.

५०. (१) (अ) विद्यापीठाच्या स्थिरीकरण कालावधीत, विद्यापीठाच्या जमा रकमा व खर्च यांचे वार्षिक वित्तीय अंदाज विद्यापीठ ज्या तारखेस व ज्या रीतीने तयार करील ती तारीख व अंदाज रीत राज्य शासन विहित करील. **वित्तीय अंदाज.**

(ब) कार्यकारी परिषद अशा रीतीने तयार केलेले अंदाज विचारात घेईल आणि ते फेरफारांसह किंवा फेरफारांवाचून मान्य करील आणि तिने मान्य केल्याप्रमाणे ते अंदाज राज्य शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येतील.

(क) राज्य शासनास, उक्त अंदाजांच्या संबंधात, त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि ते विद्यापीठास कळविता येतील व विद्यापीठ अशा आदेशांची बजावणी करील.

(२) (अ) विद्यापीठाचा स्थिरीकरण कालावधी संपल्यानंतर, कुलगुरू, विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी आगामी वर्षासाठी वार्षिक वित्तीय अंदाज विद्यापीठाच्या नियंत्रकाकडून तयार करवून घेईल आणि ते विचारात घेण्यासाठी आणि सूचना, कोणत्याही असल्यास, करण्यासाठी, कार्यकारी परिषदेला आणि विधिसभेला सादर करील.

(ब) कार्यकारी परिषदेस विधिसभेने केलेल्या सूचना विचारात घेता येतील आणि उक्त अंदाज फेरफारांसह किंवा फेरफारांशिवाय मान्य करता येतील.

**वित्त समिती.** ५१. (१) कार्यकारी परिषद खालील व्यक्तींचा समावेश असलेल्या वित्त समितीची रचना करील :—

(अ) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,
(ब) नियंत्रक,
(क) कार्यकारी परिषदेने, आपल्या सदस्यांतून, निवडून दिलेले तीन सदस्य.

(२) वित्त समितीला खालील शक्ती असतील :—

(अ) विद्यापीठाचे वार्षिक वित्तीय अंदाज तपासणे आणि त्यावर कार्यकारी परिषदेला सल्ला देणे,
(ब) विद्यापीठाचे वार्षिक लेखे तपासणे व त्यावर कार्यकारी परिषदेला सल्ला देणे,
(क) विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीचा वेळोवेळी आढावा घेणे,
(ड) विद्यापीठाच्या वित्त व्यवस्थेसंबंधीच्या सर्व बाबींवर कार्यकारी परिषदेकडे शिफारशी करणे,
(इ) कार्यकारी परिषदेने तसा निदेश दिला असेल तर, ज्या खर्चासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नसेल असा खर्च किंवा अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक खर्च ज्यात अंतर्भूत असेल अशा, कार्यकारी परिषदेने केलेल्या कोणत्याही प्रस्तावाबाबत, कार्यकारी परिषदकडे शिफारस करणे.

**लेखे व लेखापरीक्षा.** ५२. (१) विद्यापीठाचे वार्षिक लेखे कुलगुरुच्या निदेशान्वये नियंत्रकाकडून तयार करण्यात येतील व विद्यापीठाला कोणत्याही साधनाद्वारे उपार्जित होणारा व मिळणारा सर्व पैसा आणि विद्यापीठाने संवितरित केलेल्या व दिलेल्या सर्व रकमा यांची लेख्यांमध्ये नोंद करण्यात येईल.

(२) कुलगुरू, वार्षिक लेखे आणि ताळेबंद राज्य शासनाला सादर करील व राज्य शासन, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून नियुक्त करील अशा लेखा-परीक्षकाकडून त्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. लेखापरीक्षा करण्यात आल्यावर उक्त लेखे मुद्रित करण्यात येतील आणि लेखापरीक्षेच्या प्रतिवृत्ताच्या प्रतीसह त्याच्या प्रती कुलगुरु, कार्यकारी परिषदेला, विधिसभेला व कुलपतीला सादर करील.

(३) कार्यकारी परिषद, लेखापरीक्षेच्या प्रतिवृत्तावर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीच्या निवेदना-सह लेख्यांची प्रत व लेखापरीक्षेचे प्रतिवृत्त राज्य शासनास सादर करील आणि राज्य शासन ते, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण ९

### अनुपूरक उपबंध

**विद्यापीठ अधिक्षेत्रात काम करणारा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कर्मचारीवर्ग.** ५३. (१) (एक) विद्यापीठ अधिक्षेत्रात असतील अशी आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७ याच्या कलम ७ अन्वये त्या विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात आलेली कोणतीही घटक महाविद्यालये, परिसंस्था, केन्द्रे किंवा इतर कामे यांमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वी काम करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती (मग ती प्रतिनियुक्तीवरील शासकीय कर्मचारी असो किंवा महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या सेवेत कायमची सामावून घेतलेली असो किंवा प्रत्यक्षतः त्या विद्यापीठाने नियुक्त केलेली असो) उक्त तारखेपासून, विद्यापीठाकडे नेमून देण्यात आल्याचे मानण्यात येईल; आणि विद्यापीठ अशा व्यक्तीस आपल्याकडे घेईल व कामावर ठेवील.

**विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात येतील अशा** (दोन) कलम ७ अन्वये विद्यापीठाकडे हस्तांतरित होण्यास पात्र असतील अशा कोणत्याही परिसंस्था, केन्द्रे किंवा इतर कामे यांमध्ये काम करणारी प्रत्येक व्यक्ती आणि कर्मचारीवर्गाची आवश्यकता विचारात घेऊन राज्य शासन, वेळोवेळी, निदेश देईल असे, महात्मा फुले कृषि विद्या-पीठाच्या कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारीवर्गातील कर्मचारी (मग ते प्रतिनियुक्तीवरील

शासकीय कर्मचारी असोत किंवा उपरोक्तप्रमाणे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कर्मचारी विवक्षित असोत) आणि त्या विद्यापीठाशी संबंधित असणाऱ्या शासकीय कर्मचारीवर्गामधील कर्मचारी हे, परिसंस्था विद्यापीठ आपल्याकडे घेईल व कामावर ठेवील.

इत्यादींमधील कर्मचारीवर्ग विद्यापीठाने सामावून घेणे.

(तीन) खंड (एक) किंवा (दोन) अन्वये विद्यापीठाने आपल्याकडे घेतलेली व कामावर ठेवलेली प्रत्येक व्यक्ती, हा अधिनियम व त्या अन्वये करण्यात आलेले परिनियम व विनियम यांच्या उपबंधांस अधीन असेल :

परंतु,—

(अ) अशा कामाच्या मुदतीत, अशा व्यक्तीचे वेतन, रजा, सेवानिवृत्ती, भत्ते, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी व सेवेच्या इतर शर्ती यासंबंधातील सर्व बाबींचे नियमन, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, त्यास जे लागू झाले असते अशा नियमांद्वारे करण्यात येईल.

(ब) पदावनती, सेवेतून बडतर्फ करणे किंवा काढून टाकणे यासंबंधीचा किंवा शिक्षेचा इतर कोणताही आदेशयांविरुद्ध, अशा कोणत्याही व्यक्तीस, जर ती प्रतिनियुक्तीवरील शासकीय कर्मचारी असेल तर, राज्य शासनाकडे आणि जर ती महात्मा फुले कृषि विद्यापीठाची कर्मचारी असेल किंवा झाली असेल तर, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, अपील स्वीकारण्यास जो सक्षम होता अशा प्राधिकाऱ्याकडे, अपील करण्याचा हक्क असेल.

(२) पोट-कलमे (३) व (४) यांच्या उपबंधांस अधीन राहून, पोट-कलम (१) अन्वये विद्यापीठाने आपल्याकडे घेतलेल्या व कामावर ठेवलेल्या, राज्य शासनाचे किंवा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे स्थायी कर्मचारी असलेल्या सर्व व्यक्तींना राज्य शासनाच्या किंवा यथास्थिति, त्या विद्यापीठाच्या सेवेतील त्यांच्या पदावर धारणाधिकार असेल आणि जर त्यांनी राज्य शासनाच्या किंवा त्या विद्यापीठाच्या सेवेत परत येण्याचे ठरविले असेल तर, त्यांनी विद्यापीठाकडे केलेली सेवा, त्यांची वेतनवाढ, निवृत्तिवेतन व त्यांच्या सेवेसंबंधातील इतर बाबी यांसाठी विचारात घेतली जाईल.

(३) पोट-कलमे (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये विद्यापीठाने आपल्याकडे घेतलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षे मुदतीच्या आत, किंवा राज्य शासनाकडून ठरविण्यात येईल अशा, आणखी मुदतीत (कोणतीही असल्यास), राज्य शासनास पुढीलप्रमाणे लेखी नोटीस देईल :—

(अ) ती सेवानिवृत्त होऊ इच्छित आहे व त्यानंतर तिला शासकीय सेवेतून किंवा यथास्थिति, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त होण्याची परवानगी देण्यात येईल व ती राज्य शासनाच्या किंवा यथास्थिति, विद्यापीठाच्या सेवेत असताना निवृत्त झाली असती तर तिला भरपाई, निवृत्तिवेतन किंवा उपदान किंवा तत्सम असे सेवा समापनासंबंधीचे लाभ मिळण्याचा जो हक्क असता तेच लाभ मिळण्याचा तिला हक्क असेल, किंवा

(ब) तिला विद्यापीठ सेवेत कायमचे सामावून घेण्यात यावे आणि त्यानंतर, विद्यापीठ तिला आपल्या सेवेत कायमचे सामावून घेईल व राज्य शासनाच्या किंवा त्या विद्यापीठाच्या अधीन तिने केलेली कोणतीही सेवा, विद्यापीठाच्या अधीन केलेली सेवा म्हणून मानण्यात येईल व बदललेल्या परिस्थितीनुसार अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे तिला पारिश्रमिक, रजा व निवृत्तिवेतन यासंबंधातील सेवेच्या अटी व शर्ती आणि शिस्तविषयक बाबींच्या संबंधातील अधिकार किंवा त्याचसारखे अधिकार मिळण्याचा हक्क असेल व या गोष्टी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वी तिला ज्या अटी, शर्ती व अधिकार मिळण्याचा हक्क होता त्यापेक्षा कमी फायद्याच्या असणार नाहीत, किंवा

(क) जर ती व्यक्ती प्रतिनियुक्तीवरील शासकीय कर्मचारी असेल तर तिला यथास्थिति, शासकीय सेवेत अथवा प्रतिनियुक्तीवर असण्यापूर्वी असल्याप्रमाणे विद्यापीठाच्या सेवेत प्रत्यावर्तित होण्यास परवानगी देण्यात यावी, अथवा ती व्यक्ती त्या विद्यापीठाची कर्मचारी असेल तर, त्या विद्यापीठाच्या सेवेत प्रत्यावर्तित होण्यास परवानगी देण्यात यावी आणि त्यानंतर, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी तिला सेवेच्या ज्या अटी व शर्ती लागू असतील त्याच अटींवर व शर्तींवर तिला नोटिशीत ती विनिर्दिष्ट करील अशा सेवेत प्रत्यावर्तित होण्याची परवानगी देण्यात येईल.

सेवेतून सेवानिवृत्त होण्याचा किंवा शासकीय सेवेत परत येण्याचा पर्याय जिने स्वीकारला असेल व या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७ याच्या कलम ५३ अन्वये अशा पर्यायासंबंधी जिने वेळीच अगोदर नोटीस दिलेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(४) पोट-कलम (१) अन्वये, विद्यापीठाने आपल्याकडे घेतलेली कोणतीही व्यक्ती पोट-कलम (२) अन्वये वेळीच नोटीस देण्यास कसूर करील तर, पोट-कलम (३), खंड (ब) अन्वये तिने विद्यापीठाच्या सेवेत स्थायी स्वरूपात सामावून घेण्याचा पर्याय स्वीकारल्याचे मानण्यात येईल.

(५) या कलमात काहीही अंतर्भत असले तरी, विद्यापीठाने आपल्याकडे घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, अशी व्यक्ती योग्य नाही किंवा त्यांच्या गरजांपेक्षा अधिक आहे असे विद्यापीठाचे मत असेल तर, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांच्या मुदतीत विद्यापीठास, उक्त व्यक्तीस शासकीय सेवेकडे किंवा यथास्थिति, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या सेवेकडे प्रत्यावर्तित करण्यासंबंधी राज्य शासनास कळवता येईल. विद्यापीठाने कळवल्यानंतर राज्य शासन किंवा यथास्थिति, ते विद्यापीठ उक्त व्यक्तीस आपल्या सेवेत परत घेईल.

या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७, याच्या कलम ५३ अन्वये महात्मा फुले कृषि विद्यापीठाने जिच्या शासकीय सेवेतील प्रत्यावर्तनाबद्दल राज्य शासनास विनंती केली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**विवक्षित नेमणुका कराराधीन असणे.**

५४. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा जी तरतूद करण्यात आली असेल, त्याशिवाय प्रत्येक वेतनी अधिकाऱ्याची व विद्याविषयक कर्मचारीवर्गाच्या सदस्यांची नेमणूक लेखी करारान्वये करण्यात येईल. उक्त करार कुलसचिवापुढे ठेवण्यात येईल व त्याची एक प्रत संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात येईल.

(२) असा कोणताही कर्मचारी, विद्यापीठातील किंवा विद्यापीठाबाहेरील कोणत्याही कामाकरिता, परिनियमान्वये तरतूद करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, कोणतेही पारिश्रमिक घेणार नाही.

(३) विद्यापीठ व त्याच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणताही कर्मचारी यांमधील करारातून उद्भवणारा कोणताही विवाद, संबंधित कर्मचाऱ्याने विनंती केली असता लवादी न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात येईल; असे न्यायाधिकरण, कार्यकारी परिषदेने नेमलेला एक सदस्य, संबंधित कर्मचाऱ्याने नामनिर्दिष्ट केलेला एक सदस्य आणि कुलपतीने नेमलेला एक पंच यांचे मिळून होईल. न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि न्यायाधिकरणाने ज्याबाबत निर्णय दिला असेल अशा बाबीसंबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा दाखल करता येणार नाही. अशी प्रत्येक विनंती ही, लवादाबाबत अधिनियम, १९४० याच्या अर्थानुसार, ह्या कलमाच्या अटीवर, लवादासाठी अधीन असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त अधिनियमाचे उपबंध त्याप्रमाणे लागू होतील.

**निवड समितीच्या शिफारशीवरून विद्याविषयक कर्मचारीवर्गाच्या सदस्यांची नेमणूक करणे.**

५५. याबाबतीत करण्यात आलेल्या परिनियमाच्या उपबंधानुसार त्या प्रयोजनासाठी रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून असेल त्याशिवाय विद्यापीठ, कोणत्याही व्यक्तीची विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा सदस्य म्हणून, नेमणूक करणार नाही.

**पद रिकामे होणे.**

५६. (१) अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही सदस्यास, कुलसचिवामार्फत कुलगुरूच्या नावे पत्र पाठवून, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने राजीनामा स्वीकारल्यावर अशा सदस्याचे पद रिकामे होईल.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा कोणताही सदस्य, ज्यात नैतिक अध:पाताचा अंतर्भाव होत असेल अशा अपराधाबद्दल, न्यायालयाकडून त्यास दोषी ठरविण्यात आल्यावर, उक्त प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

**तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागा भरणे.**

५७. जेव्हा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या (पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त इतर) सदस्याचे पद, अशा सदस्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी, रिकामे होईल तेव्हा, असे रिकामे पद, सोयीस्कर होईल तितक्या लवकर, एखाद्या सदस्याची यथास्थिती, निवडणूक, नामनिर्देशन, नेमणूक किंवा त्यास स्वीकृत करून, भरण्यात येईल; आणि असा सदस्य, ज्याच्या जागी त्याची निवड, नामनिर्देशन, नेमणूक करण्यात किंवा त्यास स्वीकृत करण्यात आले असेल त्या सदस्याने, जर उक्त पद रिकामे झाले नसते तर, ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्या मुदतीपर्यंत पद धारण करील :

परंतु, जर असे रिकामे झालेले पद हे, विधिसभेच्या निवडून आलेल्या सदस्याचे असेल व ते अशा सदस्याच्या पदाची मुदत ज्या तारखेस संपते त्या तारखेच्या निकटपूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत रिकामे झाले असेल तर, उक्त पद भरता कामा नये.

**रचना, जागा रिकामी असणे इत्यादी दोष असणे याच केवळ कारणा-वरून कृत्ये व कामकाज अवैध न होणे.**

५८. विधिसभा, कार्यकारी परिषद किंवा विद्या परिषद किंवा इतर कोणतेही प्राधिकरण किंवा विद्यापीठाची संस्था यांची यथोचितरीत्या रचना करण्यात आलेली नसली किंवा त्यांच्या रचनेत किंवा पुनर्रचनेत कोणत्याही वेळी दोष राहिला असला तरी आणि अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या सदस्यांची जागा रिकामी राहिली असली तरी, केवळ या कारणामुळे किंवा कारणांमुळे अशा प्राधिकरणाचे किंवा संस्थेचे कृत्य किंवा कामकाज अवैध ठरणार नाही.

**अर्थविवरणा-संबंधातील प्रश्न व विद्या-पीठाच्या प्राधि-करणाच्या किंवा संस्थेच्या रचने-संबंधातील विवाद.**

५९. या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही परिनियमाच्या किंवा विनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या अर्थविवरणासंबंधी किंवा एखादी व्यक्ती विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य म्हणून योग्य रीतीने निवडण्यात किंवा नेमण्यात किंवा स्वीकृत करण्यात आली आहे किंवा कसे किंवा असा सदस्य होण्याचा तिला हक्क आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्भवेल तर, उक्त बाब, कुलगुरूस, तिचा प्रत्यक्ष परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने विनंती अर्ज केला असता किंवा स्वत: होऊन कुलपतीकडे पाठविता येईल आणि कुलपती, संबंधित व्यक्ती किंवा संस्थेस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्या-नंतर आणि त्यास आवश्यक वाटेल असा सल्ला घेतल्यानंतर, उक्त प्रश्नाचा निर्णय करील व त्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, विधिसभेच्या दहापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी मागणी केल्याबरोबर, कुलगुरू अशी बाब कुलपतीकडे पाठवील.

**कृत्यांचे व आदेशांचे संरक्षण.**

६०. विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही प्राधिकरणांनी, संस्थांनी किंवा अधिकाऱ्यांनी यथोचितरीत्या व सद्भावनापूर्वक केलेली सर्व कृत्ये व दिलेले सर्व आदेश हे अंतिम असतील; आणि या अधिनियमास व त्याअन्वये करण्यात आलेल्या परिनियमास व विनियमास अनुसरून जे कृत्य करण्यात आल्याचे अभिप्रेत असेल अशा कोणत्याही कृत्याबद्दल, विद्यापीठाविरुद्ध किंवा त्यांच्या कोणत्याही प्राधिकरणाविरुद्ध, संस्थेविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा दाखल करता येणार नाही किंवा त्यांजकडून कोणत्याही नुकसानभरपाईची मागणी करण्यात येणार नाही.

समित्यांची रचना. ६१. ह्या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणास कोणतीही समिती नियुक्त करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशी समिती, अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय, संबंधित प्राधिकरण प्रत्येक बाबतीत ठरवील त्याप्रमाणे त्यांच्या सदस्यांची किंवा अंशत: त्यांचे सदस्य व अंशत: इतर व्यक्ती यांची मिळून होईल.

वार्षिक अहवाल. ६२. विद्यापीठाचा वार्षिक अहवाल हा कार्यकारी परिषदेच्या निदेशान्वये तयार करण्यात येईल आणि तो विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी कार्यकारी परिषदेकडून विधिसभेला सादर करण्यात येईल: विधिसभेने मान्य केल्याप्रमाणे अहवाल, कुलगुरूकडून कुलपतीला व राज्य शासनाला सादर करण्यात येईल. राज्य शासन उक्त अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण १०

### संक्रमणकालीन उपबंध

पहिल्या कुलगुरूची नेमणूक. ६३. (१) कलम १३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर व्यवहार्य होईल तितक्या लवकर, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा मुदतीकरिता किंवा मुदतींकरिता आणि अशा अटींवर आणि शर्तींवर, राज्य शासनाकडून पहिल्या कुलगुरूची नेमणूक करण्यात येईल.

(२) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये यथोचितरीत्या नेमणूक करण्यात येईतोपर्यंत, राज्य शासनाने राज्यातील इतर कोणत्याही विद्यापीठाच्या कुलगुरूचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीची विद्यापीठाचा पहिला कुलगुरू म्हणून काम करण्यासाठी नेमणूक करणे, हे विधिसंमत असेल.

पहिल्या कुलसचिवाची नेमणूक. ६४. कलम १५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासन, वेळोवेळी निश्चित करील अशा मुदतीकरिता किंवा मुदतींकरिता आणि अशा अटींवर आणि शर्तींवर, राज्य शासनाकडून पहिल्या कुलसचिवाची नेमणूक करण्यात येईल.

पहिल्या कुलगुरूच्या संक्रमणकालीन शक्ती. ६५. (१) पहिल्या कुलगुरूने, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, निदेश देईल अशा मुदतीच्या किंवा मुदतींच्या आत, प्रकरण ४ च्या उपबंधानुसार विधिसभा, कार्यकारी परिषद, विद्या परिषद व विद्यापीठाची इतर प्राधिकरणे यांच्या रचनेसाठी व्यवस्था करणे, हे त्याचे कर्तव्य असेल.

(२) पहिला कुलगुरू, या अधिनियमाच्या उपबंधास व राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून, उपरोक्त प्राधिकरणांच्या निवडणूक पद्धतीचे नियमन करण्यासाठी, त्यांची रचना करण्यासाठी व त्यांच्या सभांच्या वेळी अनुसरावयाच्या कार्यरीतीचे व त्यांमधील कामकाजाचे नियमन करण्यासाठी आणि विद्यापीठीय परीक्षा घेण्यासाठी आणि त्यांचे संचालन करण्यासाठी आवश्यक असतील असे, पहिले परिनियम व विनियम करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये रचना करण्यात आलेली प्राधिकरणे, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखांस त्यांची पहिली सभा घेतील.

पहिल्या विधिसभेची रचना. ६६. कलम २५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून, त्या कलमाच्या उपबंधानुसार रचना केलेल्या विधिसभेची पहिली सभा घेण्यात येईल

तोपर्यंत पुढील सदस्यांची मिळून झालेल्या विधिसभेची या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :—

## एक—पदसिद्ध सदस्य

### प्रवर्ग—अ

(एक) कुलपती,
(दोन) प्रति-कुलपती,
(तीन) कुलगुरू,
(चार) सहयोगी अधिष्ठाते,
(पाच) कुलसचिव.

### प्रवर्ग—ब

(एक) कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
(दोन) सचिव, महाराष्ट्र शासन, कृषि व सहकार विभाग,
(तीन) कृषि संचालक, महाराष्ट्र राज्य,
(चार) पशुसंवर्धन संचालक, महाराष्ट्र राज्य,
(पाच) संचालक, कृषि पणन व ग्रामीण वित्तव्यवस्था, महाराष्ट्र राज्य,
(सहा) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,
(सात) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
(आठ) संचालक, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,
(नऊ) दुग्धशाळा विकास आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
(दहा) मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य,
(अकरा) मुख्य अभियंता (पाटबंधारे), महाराष्ट्र राज्य,
(बारा) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ.

### प्रवर्ग—क

राज्यातील इतर विद्यापीठांचे कुलगुरू.

## दोन—इतर सदस्य

प्रवर्ग (अ)—

राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे —

(एक) महाराष्ट्र विधानसभेचे दोन सदस्य,
(दोन) महाराष्ट्र विधानपरिषदेचे दोन सदस्य.

प्रवर्ग (ब)—

राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे —

(एक) दोन कृषि पंडित व उद्यान पंडित,
(दोन) तीन प्रगत शेतकरी, त्यांच्यापैकी, एक अनुसूचित जमातीचा व एक अनुसूचित जातीचा असेल,
(तीन) पशु, मेष, किंवा कुक्कुट यांचा एक प्रगत पैदासकार,
(चार) एक महिला समाज कार्यकर्ती,
(पाच) एक प्रगत मच्छिमार,
(सहा) प्रक्रिया सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,
(सात) शेतकी सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,
(आठ) कोणत्याही मूलोद्योग कृषि शाळेत कृषिविषयक विषयांचे अध्यापन करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य.

९८८



प्रवर्ग (क)—

जिल्हा परिषदा, स्नातक, विद्यार्थी, विद्याविषयक कर्मचारीवर्ग व परिसंस्था यांचे प्रतिनिधी—

(एक) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे जिल्हा परिषदांच्या कृषिविषयक समित्यांचे तीन अध्यक्ष,

(दोन) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा प्रत्येक विद्याशाखेतील नोंदणीकृत स्नातकांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,

(तीन) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा स्नातकोत्तर विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,

(चार) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा स्नातकपूर्व विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,

(पाच) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा घटक महाविद्यालयातील विद्याविषयक कर्मचारीवर्गाचे प्रतिनिधित्व करणारा एक सदस्य,

(सहा) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने नामनिर्देशित करावयाचा ग्रामोद्योगासंबंधीच्या बाबींचे ज्ञान असणारा एक तज्ज्ञ,

(सात) अध्यक्ष, मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक—पदसिद्ध,

(आठ) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक—पदसिद्ध,

(नऊ) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ—पदसिद्ध.

पहिल्या कार्यकारी परिषदेची रचना.

६७. कलम २८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून त्या कलमाच्या उपबंधांनुसार रचना करण्यात आलेल्या कार्यकारी परिषदेची पहिली सभा घेण्यात येईल तोपर्यंत पुढील सदस्यांची मिळून झालेल्या कार्यकारी परिषदेची या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :—

(एक) कुलगुरू—पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) कृषि संचालक, किंवा कृषि सह-संचालकापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याने नामनिर्देशित करावयाची व्यक्ती,

(तीन) पशुसंवर्धन संचालक, किंवा पशुसंवर्धन सह-संचालकापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याने नामनिर्देशित करावयाची व्यक्ती,

(चार) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे विधिसभेचे दोन सदस्य,

(पाच) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा विद्याविषयक कर्मचारीवर्गातील कर्मचारी असणारा विद्यापरिषदेचा एक सदस्य,

(सहा) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक विख्यात कृषि शास्त्रज्ञ.

कुलसचिव हा कार्यकारी परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

पहिल्या विद्यापरिषदेची रचना.

६८. कलम ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून त्या कलमाच्या उपबंधांनुसार रचना केलेल्या विद्यापरिषदेची पहिली सभा होईतोपर्यंत, पुढील सदस्यांची मिळून झालेल्या विद्यापरिषदेची या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ रचना करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :—

(एक) कुलगुरू-पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) सहयोगी अधिष्ठाते,

(तीन) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या प्रत्येक विद्याशाखेमधील विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा एक सदस्य,

(चार) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा विधिसभेचा एक सदस्य.

कुलसचिव हा विद्यापरिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

## प्रकरण अकरा

### महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७, यामध्ये परिणामरूप सुधारणा व संकीर्ण उपबंध

**सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम तेवीस यामधील सुधारणा.**

६९. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७, हा, याद्वारे, या अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीत नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत व रीतीने सुधारण्यात येत आहे.

**अडचणी दूर करणे.**

७०. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास, प्रसंगानुरूप आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, परंतु हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून दोन वर्षानंतरची नसेल अशा मुदतीत, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या उद्देशांशी व प्रयोजनांशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल.

**रद्द करणे व व्यावृत्ति.**

७१(१) कोकण कृषि विद्यापीठ अध्यादेश, १९७२, हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही, अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या अध्यादेशान्वये, केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

## पहिली अनुसूची

[ कलम २ चा खंड (के) पहा ]

### विद्यापीठ अधिक्षेत्र

बृहन्मुंबईतील व मुंबई महसुली विभागाच्या ठाणे, कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील क्षेत्र.

## दुसरी अनुसूची

(कलम ६९ पहा)

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९६७ यामध्ये,—

(१) कलम २ मधील खंड (डअ) आणि (जे) वगळण्यात येतील.

(२) कलम ७ मधील पोट-कलम (८) नंतर पुढील पोट-कलमाची भर घालण्यात येईल:—

"(९) या कलमात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, कोकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून, दापोली येथील कृषि महाविद्यालय व मुंबई येथील पशुवैद्यक महाविद्यालय आणि इतर विवक्षित परिसंस्था, विद्यापीठाकडे निहित असण्याचे बंद होईल व त्या अधिनियमाच्या कलम ७ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे दुसऱ्या विद्यापीठाकडे जातील व त्या त्याजकडून चालविण्यात येतील.".

(३) कलम ३८ मधील पोट-कलम (१-अ) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल:—

"(१-ब) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून, त्या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे विद्यापीठ अधिक्षेत्रात असलेले कोणतेही महाविद्यालय किंवा इतर शैक्षणिक संस्था उक्त विद्या-

पीठाशी संलग्न असण्याचे बंद होईल व उक्त अधिनियमाच्या उपबंधांन्वये त्या दुसऱ्या विद्यापीठाशी संलग्न करण्यात आल्याचे मानण्यात येईल.".

(४) कलम ४३ मधील पोट-कलम (२) मधील "उपक्षेत्रात" हा मजकूर वगळण्यात येईल.

(५) कलम ४६ मधील पोट-कलम (२) मधील "विद्यापीठ उपक्षेत्राच्या आणि" हा मजकूर वगळण्यात येईल.

(६) कलम ४७ मधील "उपक्षेत्राच्या आणि" हा मजकूर वगळण्यात येईल.

(७) कलम ५३ मधील पोट-कलम (६) यानंतर पुढील पोट-कलमाची भर घालण्यात येईल :—

"(७) या कलमात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, जिला कोकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२ याचे कलम ५३ लागू असेल अशी या कलमान्वये विद्यापीठाने आपल्याकडे घेतलेली व कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती, त्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून, उक्त अधिनियम व तदन्वये केलेले परिनियम व विनियम यांच्या उपबंधांच्या अधीन असेल.".

(८) अनुसूचीतील "विभाग सोडून" या मजकुरानंतर पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :—

"आणि तसेच कोंकण कृषि विद्यापीठ अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून बृहन्मुंबई व मुंबई महसुली विभागाचे ठाणे, कुलाबा आणि रत्नागिरी जिल्हे सोडून".

(यथार्थ अनुवाद),

के. मा. आराध्ये,

भाषा संचालक,

महाराष्ट्र राज्य.

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1972

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (AMENDMENT) ACT, 1972.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १७ जुलै १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1972

## AN ACT TO AMEND THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २१ जुलै १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, यात यापुढे येणाऱ्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ यात सुधारणा करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (सुधारणा) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.

(२) तो, ७ जून १९७२ पासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

२. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ४ मधील पोट-कलम (१) मध्ये,— सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम ४ ची सुधारणा.

(अ) खंड (ब) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(बब) निबंधक, पदसिद्ध";

(ब) खंड (ह) मध्ये "कार्यकारी संचालक" या मजकुराऐवजी, "अध्यक्ष" हा शब्द दाखल करण्यात येईल.

(क) खंड (प) मध्ये "असोसिएशनचा" या मजकुराऐवजी, "असोसिएशन लिमिटेडचा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस यामध्ये कलम २१ अ समाविष्ट करणे.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम २१ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सोईस्कर ठिकाणी पुरेशी संच्रयन केंद्रे निर्दिष्ट करणे व ती चालविणे हे प्रत्येक बाजार समितीचे कर्तव्य असणे.

"२१-अ. (१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कापूस उत्पादकांना आणि त्याचा साठा धारण करणाऱ्या इतर व्यक्तींना कपास देता यावा यासाठी, आवश्यकतेनुसार, एक किंवा अधिक सोईस्कर ठिकाणे निर्दिष्ट करणे आणि ती चालविणे हे प्रत्येक बाजार समितीचे कर्तव्य असेल.

(२) पणन संचालकास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्याची अशी खात्री होईल की, कोणत्याही बाजार समितीने निर्दिष्ट केलेले कोणतेही संचयन केंद्र हे, ज्यांना कपास द्यावयाचा आहे अशा उत्पादकांना आणि इतर व्यक्तींना सोईस्कर नाही किंवा बाजार समितीने कोणतेही संचयन केंद्र निर्दिष्ट केलेले नाही किंवा तिने निर्दिष्ट केलेले संचयन केंद्र हे त्या ठिकाणच्या गरजा भागविण्यासाठी पुरेसे नाही तर, त्याजकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल असे ठिकाण किंवा अशी ठिकाणे संचयन केंद्र किंवा केंद्रे म्हणून बाजार समितीने निर्दिष्ट करून ती चालवावी असा निदेश त्यास, आदेशाद्वारे, देता येईल आणि बाजार समिती अशा निदेशाचे पालन करील.

(३) तक्रार करण्यात आल्यावर किंवा अन्यथा, पणन संचालकांची अशी खात्री होईल की, पोट-कलम (२) अन्वये त्याने दिलेल्या कोणत्याही निदेशाचे, बाजार समितीकडून, वाजवी मुदतीत, पालन करण्यात आलेले नाही तर, त्यास, बाजार समितीस निदान पंधरा दिवसांची नोटीस दिल्यानंतर आणि तिला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधि दिल्यानंतर, आदेशाद्वारे निदेशाच्या पालनार्थ मुदत निश्चित करता येईल आणि असा आदेश बाजार समितीस कळविता येईल.

(४) अशा रीतीने निश्चित केलेल्या मुदतीत निदेशाचे पालन करण्यात आले नाही तर, पणन संचालकास, त्या निदेशाच्या पालनार्थ एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशा रीतीने नेमलेल्या व्यक्तीचे वाजवी पारिश्रमिक धरून अशा (निदेशाच्या) पालनाचा खर्च बाजार समितीने, वेळोवेळी, आपल्या बाजार निधीमधून द्यावा असा आदेश देता येईल. अशा रीतीने देय असलेल्या कोणत्याही रकमा, राज्य शासनाला देय असलेल्या रकमा असल्याचे समजण्यात येईल आणि जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे त्या वसूल करता येतील.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम २२ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये, "बाजार समितीच्या देखरेखीखाली" या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि "संबंधित अधिकाऱ्याकडून" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी "या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधानुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम २६ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मध्ये, "बाजार समितीमार्फत" या मजकुरानंतर "किंवा कोणत्याही सहकारी संस्थेमार्फत किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम २७ ची सुधारणा.

"२७. कपास देणाऱ्या व्यक्तीला द्यावयाच्या आगाऊ किमतीमधून, कोणत्याही सहकारी संस्थेस देय असलेल्या कोणत्याही रकमा किंवा महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियम) अधिनियम, १९६३ याद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही अधिसूचित उत्पन्नाच्या बाबतीत, ज्या रकमा वजा करण्यासाठी बाजार समितीस प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही देय रकमा, त्या अधिनियमात ठरवून दिले असेल त्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीने, बाजार समितीस किंवा यथास्थिती, प्राधिकृत सहकारी संस्थेस किंवा व्यक्तीस, वजा करता येतील व शिल्लक रकमा, कपास देणाऱ्या व्यक्तीला देता येईल :

परंतु, भविष्यात, वेळोवेळी, (संबंधित व्यक्ती, ज्या प्रमाणात कपास) देण्याची शक्यता असेल ते प्रमाण विचारात घेतल्यानंतर, योग्य वाटतील अशा हप्त्यांमध्ये वजाती करता येतील.".

सहकारी संस्थांना तसेच बाजार समितीस देय असलेल्या रकमांबद्दल आगाऊ किमतीमधून करावयाची वजात.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३, पोट-कलम (२) मध्ये, "प्रारंभिक अंशदान म्हणून निधी-मध्ये देण्यात येणारे एक कोटी रुपये" या मजकुराऐवजी "एक कोटी रुपयांचे प्रारंभिक अंशदान आणि वेळोवेळी आवश्यक असेल त्याप्रमाणे निधीसाठी आणखी अंशदाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम ३३ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम ३८ ची सुधारणा.

"३८. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाकडून किंवा त्याच्या वतीने, सरकी काढलेल्या कापसाच्या गासडयाची विक्री कोणत्याही व्यक्तीस करण्यात येईल आणि विक्री करण्यात आलेल्या माला या दर्जाबाबत किंवा अशा मालाच्या किमतीबाबत किंवा तो पाठविण्याबाबत किंवा विक्री संबंधातील इतर कोणत्याही बाबीबाबत, विक्रेता आणि खरीदीदार या दोघांमध्ये विवाद असेल त्यावेळी, पक्षकारांनी तडजोड करून तो मिटविला नसेल तर; विवादातील पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकारास, उक्त विवाद ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनकडे (ज्याचा या कलमात यापुढे "असोसिएशन" असा निर्देश करण्यात आला आहे) विचारार्थ पाठविता येईल.

(२) मागील पूर्ववर्ती पोट-कलमान्वये असा कोणताही विवाद असोसिएशनकडे विचारार्थ पाठविण्यात आला असेल त्याबाबतीत, असोसिएशनच्या लवादासाठी तो सादर करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि उक्त असोसिएशनच्या उपविधींच्या उपबंधानुसार त्याचा निर्णय करण्यात येईल. अशा विवादांचा निर्णय करण्याकरिता असोसिएशनच्या उप-विधीन्वये नेमलेल्या प्राधिकाऱ्याने दिलेला निवाडा किंवा निर्णय हा, संबंधित पक्षकारांना कळविण्यात येईल आणि

शासनाकडून विक्री केलेल्या कापसाच्या व गासडयांच्या संबंधातील विवाद ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन लिमिटेडकडे विचारार्थ पाठविणे.

आणि त्या असोसिएशनचा निर्णय अंतिम असणे.

असोसिएशनच्या उप-विधींमध्ये तरतूद असेल त्याप्रमाणे, त्यांना एक किंवा अधिक अपिले करण्याचा अधिकार असेल.

(३) सर्वेक्षण, लवाद आणि अपिले यांसाठी देय असलेली फी आणि मंजूर करण्यात येतील असे खर्च आणि लवादाकडे विचारार्थ पाठविण्यासाठी आणि अपिले दाखल करण्यासाठी असलेली कालमर्यादा या गोष्टी, असोसिएशनच्या उप-विधींच्या तरतुदींनुसार असतील.

(४) असोसिएशनच्या उप-विधींमध्ये तरतूद केल्याप्रमाणे, अपिलास किंवा अपिलांस अधीन राहून, विवादाचा निर्णय करण्यासाठी नेमलेल्या प्राधिकरणाने दिलेला कोणताही निवाडा किंवा निर्णय आणि अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, संबंधित अपील प्राधिकरणाचा निर्णय हा, अंतिम असेल आणि तो संबंधित पक्षकारांना बंधनकारक असेल.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम सत्तेचाळीस याच्या कलम ४२ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ४२ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) (अ) राज्य शासनास, आपल्या वतीने, कापसाची खरेदी करण्याच्या, विक्री करण्याच्या, साठा करण्याच्या, त्यावर प्रक्रिया करण्याच्या, त्याची खरेदीविक्री व इतर व्यवहार करण्याच्या प्रयोजनासाठी, संपूर्ण राज्यासाठी किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रासाठी, एजंट नेमता येतील आणि असा कोणताही एजंट अशा एकाहून अधिक क्षेत्राकरिता नेमता येईल.

(ब) अशा रीतीने नेमलेल्या कोणत्याही एजंटला, याबाबतीत, राज्य शासनाने विशेषरीत्या प्राधिकृत केले असेल तर, त्यास आपला कापसाचा व्यवहार चालू ठेवण्यासाठी आवश्यक असेल असा कोणताही पैसा कर्जाच्या किंवा आगाऊ रकमेच्या स्वरूपात उभारण्याच्या प्रयोजनासाठी, एजंट म्हणून त्यावेळी त्याच्या ताब्यात असलेला सर्व कापूस किंवा त्याचा कोणताही साठा, तारण म्हणून देण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावण्याचा हक्क असेल आणि जिच्या नावे असे कोणतेही तारण ठेवण्यात आले असेल, गहाण ठेवण्यात आले असेल किंवा विल्हेवाट लावण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशा तारणामुळे, गहाणामुळे किंवा विल्हेवाटीमुळे तेच अधिकार मिळतील जे तिला जर असा एजंट हा अशा रीतीने तारण दिलेल्या किंवा यथास्थिती, गहाण ठेवलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या कापसाच्या साठ्याचा मालक असता तर मिळाले असते.

(क) राज्य शासन आणि संबंधित एजंट आपापसात कबूल होतील त्याप्रमाणे अशा एजंटाच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती असतील".

सन १९७२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ रद्द करणे व व्यावृत्ति.

१०. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (सुधारणा) अध्यादेश, १९७२ हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मूळ अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मूळ अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

के. ना. आराध्ये,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

## MAHARASHTRA ACT No. XX OF 1972

### THE MAHARASHTRA APPROPRIATION ACT, 1972

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २८ जुलै १९७२ रोजी मिळाली असल्यामूळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XX OF 1972

### AN ACT TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 1973

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २९ जुलै १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

### सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

**दिनांक एकतीस मार्च १९७३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतुन आणखी विवक्षित रकमा देण्याचा व त्यांचा विनियोग करण्याचा प्राधिकार देण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २०४ अन्वये, दिनांक एकतीस मार्च १९७३ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी रकमांच्या विनियोगासाठी, विनियोजन अधिनियम संमत करून घेण्याकरिता आणि उक्त रकमा देण्याचा प्राधिकार देण्याच्या प्रयोजनाकरिता तरतूद करणे आवश्यक आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव

९८६



सन १९७२-७३ या वर्षासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून १३ अब्ज, १३ कोटी, ६९ लक्ष, ६८ हजार, ७६० रुपये देणे.

२. राज्याच्या एकत्रित निधीतून, दिनांक एकतीस मार्च १९७३ रोजी संपणाऱ्या वर्षात यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कामे व प्रयोजने यांच्या बाबतीत कित्येक खर्च भागविण्यासाठी रकमा देतेवेळी, अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमां-पेक्षा अधिक नसतील इतक्या तेरा अब्ज, तेरा कोटी, एकोणसत्तर लक्ष, अडुसष्ट हजार, सातशे साठ रुपये एकूण बेरीज होणाऱ्या रकमा [ महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, १९७२, याच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमांचा यात समावेश होतो ] देता येतील व त्यांचा विनियोग करता येईल.

विनियोजन.

३. या अधिनियमाद्वारे राज्याच्या एकत्रित निधीतून ज्या रकमा देण्याचा व ज्यांचा विनियोग करण्याचा प्राधिकार देण्यात आला आहे त्या रकमांचा विनियोग दिनांक एकतीस मार्च १९७३ रोजी संपणाऱ्या वर्षासंबंधात अनुसूचीत दर्शविलेली कामे व प्रयोजने यांकरिता करण्यात येईल.